# प्रकरण - तिसरे

## पेशवेकालीन सरदार पाटणकर घराणे

**प्रस्तावना :-**

मराठयांच्या स्वातंञ्ययुध्दामध्ये सरदार पाटणकर घराण्यांने दाखविलेल्या पराक्रमाने त्यांच्यातील क्षात्रतेज जागृत झालेले दिसून येते. वेळोवेळी त्यांच्या कर्तृत्वाची दखल खुद्द छत्रपतींनी घेतल्यामुळे सरदार पाटणकर हे मराठा दरबारातील एक महत्त्वाचे सरदार बनले. आपल्या परगण्याची, महालाची योग्य व्यवस्था राखल्याने महसूल आणि लष्करी विभागामध्ये सरदार पाटणकर घराण्यांने अतुलनीय कामगिरी बजावली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर खऱ्या अर्थाने या स्वातंन्त्र्ययुध्दाचा शेवट झाला असला तरी, लवकरच मराठा राज्य दोन विभागात विभागलेले दिसून येते. असे असले तरी सरदार पाटणकर घराण्यांला जेव्हा संधी मिळाली तेव्हा त्यांनी त्या संधीचे सोने करून आपल्यावर छत्रपतींनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवलेला दिसून येतो.

इ.स. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहाचा मृत्यू झाला. त्यानंतर बादशहाचा पुत्र शाहजादाअज्जम दक्षिणेकडील मोगली सैन्य घेऊन नर्मदेपलीकडे म्हणजेच उत्तरेला निघून गेला. त्यामुळे मराठयांना आपला गेलेला मुलूख पुन्हा मिळविण्यास व मोगली ठाणी लुटण्याची संधी प्राप्त झाली. सरदार चांदजीराव पाटणकर यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र रामराव पाटणकर हे पाटण महालाचे प्रमुख झाले. ते ही आपल्या पित्याप्रमाणे शूर, पराक्रमी होते. त्यांनी उत्तरेकडील अनेक लहान मोगली ठाणी जिंकून घेतली. छत्रपती संभाजी पुत्र शाहू यांच्या सुटकेनंतर शाहूंनी अनेक मराठा सरदारांना आपल्या भेटीस बोलाविले व या सरदारांस आपल्या बाजूने वळवून घेतले. यामध्ये सरदार रामराव पाटणकरांचा समावेश होता.

शाहू महाराज आणि सरदार रामराव पाटणकर यांची चिकेवाडी येथे भेट होऊन सरदार रामराव पाटणकर आपल्या फौजेसह शाहू महाराजांना सामील झाले.[१] यावेळी सरदार चांदजीराव पाटणकर हे हयात नव्हते. कारण त्यांची मुले रामराव व सुभानराव पाटणकर हे शाहू महाराजांना भेटल्याचा व त्यांची चांदजीरावांच्या काळी चालत असलेली इनामे व वतने चालू ठेवण्याचा महत्त्वपूर्ण उल्लेख श्री राज्याभिषेक शक ३४, सर्वधारी संवत्सर, चैत्र बहुल अष्टमी, भृगुवासरे (दिनांक १ एप्रिल, १७०८) च्या पत्रात पहावयास मिळतो. तसेच शाहू महाराजांनी सरदार रामराव पाटणकर व सरदार सुभानराव पाटणकर यांना पाटण महालीचा इनाम पूर्ववत चालू ठेवावा, असे इनाम पत्र दिले होते. या इनामपत्रात शाहू महाराज असे म्हणतात की, '......आपले वडील चांदजीराऊ याणी राज्यामध्ये श्रमसाहाय विशेष केले. त्यावरून चंजीचे मुकामी तिर्थस्वरूप राजश्री याणी कृपाळू होऊन परगणे पाटण माहालापैकी ११ गाव अकरा गावे अडूल परगणे कऱ्हाड देह १ यैसे पहिले चालत होते. त्यादेखील पाटण माहाल कुलबाब कुलवानू हालीपटी व पेस्तर पटी झाडझाडोरा पडीले पान सहीत खेरीज हकदार व ईनामदार करून माहाल पुत्रपौत्रादी वौंश परंपरेने ईनाम करून दिल्हा आहे. त्याची वृतीपत्रे करून दिल्ही आहेत......'.[२] म्हणजेच शाहू महाराजांनाही सरदार पाटणकर यांचे स्वराज्यातील महत्त्व तसेच जिंजी मुक्कामी छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांना जो पाटण व अडुल येथील इनाम दिला होता. तो वंशपरंपरेने जसेच्या तसे उपभोगित जाणे, अशी आज्ञा करून इनाम पूर्ववत ठेवलेला दिसून येतो.

या आज्ञापत्रात पुढे शाहू महाराज असे म्हणतात की, '......तुमचे बाप चांदजीराऊ यास ईनाम करून दिल्हा. त्या मागे तुम्ही स्वामीची सेवा येकनिष्टपणे करीता. त्यावरून स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन तुम्हास पाटण माहाल ईनाम दिल्हा होता तो स्वामीने करार करून हे पत्र सादर केले असे. तरी तुम्ही व तुमचे वौंशपरंपरेने ईनाम अनभऊन सूखरूप देशमुखीची सेवा करून असेणे जाणिजे.......'.[३] शाहूंना स्वराज्यात येताना छत्रपती गादी

मिळवायची असेल तर अनेक मातब्बर सरदारांना आपल्याकडे असणे गरजेचे वाटत होते. अशा मातब्बर सरदारांमध्ये पाटण महालातील सरदार पाटणकर यांचा ही समावेश होता. त्याची स्वराज्याप्रती असलेली निष्ठा तसेच युध्दकौशल्य हे शाहू महाराजांनी जाणल्यामुळे त्यांनी त्यांचे ईनाम पूर्ववत चालू ठेवले होते.

महाराणी ताराबाई व शाहू महाराज यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र बनला. सेनापती धनाजी जाधव आणि प्रतिनिधी यांच्याकडे मोठे सैन्य देऊन महाराणी ताराबाईंनी शाहू महाराजांवर चाल केली. उभय सैन्यांची गाठ पुण्याच्या उत्तरेस १५ कोसांवर पडली व लढाई सुरू झाली.[४] परंतु सेनापती धनाजी जाधव यांनी ऐनवेळी महाराणी ताराबाई यांची साथ सोडून शाहू महाराजांना मदत केली. तेव्हा महाराणी ताराबाई यांच्या सैन्याचा पराभव झाला. प्रतिनिधी साताऱ्यास पळून गेले.[५] या युध्दानंतर शाहू महाराज यांनी राजश्री धनाजी जाधव आणि सरदार रामराव पाटणकर यांच्या मदतीने साताऱ्याजवळील चंदन आणि वंदन हे दोन किल्ले जिंकून घेतले.[६] नंतर सातारा किल्ला हस्तगत करून शाहू महाराज छत्रपती झाले.[७]

सरदार रामराव पाटणकर यांना सैन्य देऊन छत्रपती शाहू महाराज त्यांच्यावर राजगड किल्ला सर करण्याची जबाबदारी देतात. सरदार रामराव पाटणकर यांनी अथक प्रयत्नाने व हुशारीने राजगड किल्ला जिंकून घेतला. या किल्ल्यावर छत्रपती शाहूंचे निशाण फडकविले. तेव्हा त्यांच्या या पराक्रमावर खुश होऊन छत्रपती शाहू महाराज त्यांना करवीर इलाख्यापैकी भुदरगड पेठयांतील १०/११ गांवची सरदेशमुखी रामरावांकडे पूर्वापार चालत होती, ती मध्यल्या काळात सुरळीत चालत नव्हती ते वतन सरदार रामराव पाटणकरांकडे निर्वेध चालू केले.[८] शाहू महाराजांनी सरदार पाटणकर यांच्यावर जो विश्वास दाखविला होता, तो विश्वास त्यांनी सार्थ ठरविलेला दिसून येतो.

**कृष्णराव खटावकर यांच्यावरील मोहिमेत सरदार पाटणकर:**

सरदार रामराव पाटणकर यांच्या मृत्यूनंतर पाटण महालाची देशमुखी त्यांचे पुत्र नागोजीराव पाटणकर यांचेकडे आली. नागोजीराव पाटणकर हे वडिलांप्रमाणे शूर होते. छत्रपती शाहू महाराजांच्या भेटी दरम्यान एखादया मोहिमेवर पाठविण्याची विनंती त्यांनी केली. या विनंतीचा विचार करून छत्रपती शाहू महाराज त्यांना शंभू महादेवांच्या डोंगराकडे कृष्णराव खटावकर फार उपद्रव करीत होता, त्या मोहिमेवर बाळाजी विश्वनाथ यांचेबरोबर जाण्याची आज्ञा केली.[९] सरदार नागोजीराव पाटणकर यांच्या पराक्रमामुळे कृष्णराव खटावकर यांचा पराभव झाला आणि खटावकरांला कैद करण्यात आले. छत्रपती शाहू महाराजांसमोर खटावकरांनी आपल्या अपराधांची क्षमा मागितली असता छत्रपती शाहू महाराजांनी खटावकरांस दया दाखवून खटाव गांव वंशपरंपरा इनाम करून दिले.[१०]

**सिद्दीचा पाडाव:**

कोकणात पेशवा बहिरोपंत पिंगळे यांस महाराणी ताराबाई गटाचा आरमारप्रमुख आंग्रे यांचा बंदोबस्त करण्यास शाहू महाराजांनी पाठविले. परंतु पिंगळे यांचा पराभव होऊन लोहगड व राजमाची किल्ले आंग्रे यांनी जिंकून घेतले.[११] पुढे सरदार नागोजीराव पाटणकर व बाळाजी विश्वनाथ यांना आंग्रे यांचेवर चालून जाण्याचा हुकुम छत्रपती शाहू महाराजांनी केला. बाळाजी विश्वनाथ यांनी मोठया युक्तीने आंग्रे यांना छत्रपती शाहू महाराजांकडे वळविले. यावेळी सिद्दीच्या ताब्यातील प्रदेश आपोआपच शाहू महाराजांकडे आला.[१२] पुढे सिद्दीने आंग्रे यांच्या मुलूखावर स्वारी केली असता, बाळाजी विश्वनाथ व सरदार नागोजीराव पाटणकर हे आंग्रे यांच्या मदतीस गेले.[१३] या लढाईत सरदार नागोजीराव पाटणकरांनी दाखविलेल्या असामान्य पराक्रमामुळे सिद्दीचा पराभव झाला. सातार्‍यास परत आल्यावर छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ यांस सन १७१४ मध्ये पेशवाईची वस्त्रे दिली.[१४]

**दमाजी थोरात यांच्या बंदोबस्तामध्ये सरदार पाटणकरांचा सहभाग:**

महाराणी ताराबाई यांचेकडील एक मातब्बर सरदार दमाजी थोरात हे हिंगण गावच्या किल्ल्यांत राहून छत्रपती शाहू महाराजांच्या मुलूखातील जनतेला उपद्रव करीत असे. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी सचिवांस पाठविले. परंतु या लढाईत सचिवांचा पराभव झाला व त्यांना दमाजी थोरात यांनी कैद केली. तेव्हा छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथ व सरदार नागोजीराव पाटणकर यांचे सोबत सैन्य देऊन दमाजी थोरात याचा बिमोड करण्याचे आदेश दिले. सरदार नागोजीराव पाटणकर यांच्या सैन्याने दमाजी थोरात यांचा पाडाव केला आणि दमाजी थोरात याला कैद करण्यात आली. तसेच हिंगणगांव किल्ल्याचा तट पाडण्यात आला.[१५]

**दिल्ली मोहिमेतील सरदार पाटणकरांची कामगिरी:**

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिल्ली दरबारी अराजकता माजली होती. त्यावेळी फरूखशियर बादशहा गादीवर होता. फरूखशियर बादशहाला गादीवर येण्यासाठी सय्यद बंधूचा मोठा वाटा होता. त्यामुळे दिल्ली दरबारी सय्यद बंधूचे मोठे वजन होते. काही दिवसांनी बादशहाला सुध्दा त्यांच्या वर्चस्वाचा त्रास होऊ लागला. तेव्हा बादशहाने दोन भावांमध्ये फुट पाडण्याचे ठरविले. त्यानुसार सय्यद बंधूपैकी लहान असलेल्या हुसेन अल्लीखान याला दक्षिणेचा सुभेदार नेमून त्याची बादशहाने रवानगी केली. पूर्वीचा दक्षिणेचा सुभेदार असलेला दाऊद खान याला गुजरातचा सुभेदार म्हणून नियुक्ती केली. तसेच हुसेन अल्लीखान याला दक्षिणेचा अधिकार मिळू नये, अशी तजवीज केली. त्यानुसार सुभेदार दाऊद खान आणि हुसेन अल्लीखान यांच्यात लढाई झाली. या लढाईत हुसेन अल्लीखान विजयी झाला आणि त्याने दक्षिणेची आघाडी शांत राहावी म्हणून छत्रपती शाहू महाराजांशी तह केला.[१६]

उभयतांमध्ये झालेला हा तह दिल्ली अधिपती फरूखशियर बादशहा याला मान्य झाला नाही. तेव्हा बादशहाची कपटनीती सय्यद बंधूंच्या लक्षात येताच त्यांना छत्रपती शाहू महाराजांकडे मदत मागितली. छत्रपती शाहूंनी तहान्वये मदत म्हणून सरदार खंडेराव दाभाडे, सरदार नागोजीराव पाटणकर व बाळाजी विश्वनाथ यांचे बरोबर सैन्य देऊन पाठविले.[१७] सय्यद बंधूंनी या संयुक्त सैन्यासह दिल्लीकडे कूच केली. फरूखशियर बादशहास ठार करून महंमदशहा यास बादशहा म्हणून तक्तावर बसविले.[१८] यावेळी नुतन बादशहाकडून चौथाई, सरदेशमुखी आणि स्वराज्य या सनदा मराठा सरदारांनी मिळविल्या. परंतु हे दिल्ली दरबारातील अनेक लोकांना पसंद पडले नाही. तेव्हा त्यांनी मराठा सैन्यावर हल्ला केला. परंतु सरदार नागोजीराव पाटणकर व सरदार खंडेराव दाभाडे यांनी मोठा पराक्रम करून मोगल सैन्यांचा पराभव केला. सरदार नागोजीराव पाटणकर, खंडेराव दाभाडे वगैरे सरदारांनी केलेल्या पराक्रमामुळे मोगलांच्या कैदेतून महाराणी येसूबाई व मराठी माणसांची सुटका झाली. सनदा तसेच युध्दखर्च घेऊन ते स्वराज्यात परत आले.[१९]

**माळवा स्वारीत सरदार नागोजीराव पाटणकर यांचा पराक्रम:**

पेशवा बाळाजी विश्वनाथ याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र पहिला बाजीराव याला पेशवाईची वस्त्रे छत्रपती शाहूंनी दिली. इ.स. १७२५ च्या सुमारास पेशवे बाजीराव पहिले यांनी माळव्यावर स्वारी केली. त्यावेळी राजा गिरधर हा माळव्याचा सुभेदार होता. या स्वारीमध्ये सरदार नागोजीराव पाटणकर यांनी सहभाग घेतला. या स्वारीत मराठा सैन्याने राजा गिरीधर याच्या सैन्यावर मोठा विजय प्राप्त केला. सरदार नागोजीराव पाटणकर यांनी दाखविलेल्या असामान्य शौर्यामुळे राजा गिरीधर यांचा पराभव झाला. यावेळी पहिले बाजीराव यांना फक्त माळवा प्रांत लुटावयाचा होता. परंतु सरदार नागोजीराव पाटणकर यांना द्रव्यप्राप्तीपेक्षा मोगलांवर हल्ला करावयाचा होता. त्यासाठी ते पुढे उज्जनयीपासून बरेच दूर गेले होते. वाटेत जमेल तो ऐवज

लुटून ते बाजीराव पहिले यांच्या सैन्यास येऊन मिळाले. तसेच मोठया प्रमाणात द्रव्यप्राप्ती झाली. ही सर्व संपत्ती घेऊन मराठा सैन्य दक्षिणेकडे सुखरूप पोहचले.[२०] पहिले बाजीराव यांच्या दिल्लीच्या स्वारी वेळीही सरदार नागोजीराव पाटणकर ससैन्य गेले. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी मराठा राज्याची सेवा केलेली दिसून येते. दंतगिरी व गुणवंतगड या किल्ल्यांवर त्यांनी पुन्हा आपली ठाणी बसविली.[२१]

सु।। ईसने अशरीन मया अलफ, छ ११ सफर (दिनांक २० नोव्हेंबर, १७३१) रोजीचे सरदार रामराव पाटणकर यांनी रामशेठ बिन सिदशेठ कडासर यांना दिलेले पत्र उपलब्ध आहे. या इनामपत्रानुसार पाा पाटण महालाचे सरशेटेपण रामशेठ बिन सिदशेठ कडासर यांना दिलेले दिसून येते. या इनामाची एकूण ४० बिघे जमीन गावगन्ना करार केले होती, त्याचा तपशील या पत्रात दिला आहे. या इनामपत्रात रामराव पाटणकर म्हणतात की, '.....तिर्थस्वरूप राजश्री कैलासवासीया पासी तुवा येकनिष्ठतीने सेवा बहूत केली. या करिता तुजवर कृपाळू होऊन सर शेटपणाचे वतन माहालाचे करून देऊन इनाम गावगना करून दिला होता.....'.[२२] या इनामपत्रातून असे दिसून येते की, कडासर यांनी राजश्री तीर्थस्वरूप कैलासवासी चांदजीराव पाटणकर यांची एकनिष्ठपणे सेवा केली. तेव्हा या सेवेबद्दल सरदार रामराव पाटणकर यांनी पाटण महालाचे सरशेटेपण कडासर यांना दिले होते. म्हणजेच सरशेटेपण किंवा तत्सम नियुक्त्या करताना एकनिष्ठेला महत्त्व दिलेले दिसून येते.

पुढे या इनामपत्रात म्हणतात की, '.....त्यावर आम्हापांसीही तू बहुतच सिकीया ची सेवा येकनिष्ठ पणे करित आहेत. यैसीयासी वडिलांनी तुजला दत करून दिल्हे आहे. तेणे प्रमाणे करार करून देऊन इनाम तुझे दुमाल केला असे.....'.[२३] काडसर यांनी सरदार रामराव पाटणकर यांच्याकडेही एकनिष्ठपणे सेवा करित आहेत, हे दिसून येते. या

इनामाची एकूण ४० बिघे जमीन गावगन्ना करार करून दिली होती. ही गावे पुढीलप्रमाणे, ( बि।। त।। गावगना जमीन बिघे)

| | |
|---|---|
| १३ कसबे पाटण | ३ मौजे मुलगाव |
| १० बु।। कामतपैकी | १ मौजे चोपडी |
| ३ परल गोडाची वरली पटी | २ मौजे बेलवेडे खुर्द |
| १३ | |
| ३ मौजे म्हावसी | ३ मौजे दिवसी बु।। |
| १ मौजे साखरी | ३ मौजे बिबी |
| २ मौजे मेढोसी | २ मौजे पिपोलेसी |
| १।। मौजे चितपूर | |
| १।। मौजे आबुरले | १ मौजे मणदुरे |
| १ मौजे निकवणे | २ मौजे दिवसी खुर्द |
| २३ | १७ |
| | २३ तेरीज |
| | ४०[२४] |

पुढे या इनामपत्रात सरदार रामराव पाटणकर असे म्हणतात की, ‘येकूण चाळीस बिघे जमीन गावगना करार करून पुढे तुझे दुमाला केला असे. तरी वंशपरंपरान अनभऊन सीकीया येकनिष्ठे पणे सेवा चालऊन सुखरूप असणे. तुझे चालवावयास अंतर पडेल तर श्रीची शफत आसे सदरहू जमीन आ++ दमसीम ती प्रती++++ली आसे आनुभऊन सुखरूप राहाणे. जाणीजे छ ११ माहे सफर तुझे अवलादीने सीकीयाची सेवा करावयासी चुकू नये. वंशपरंपरेने सेवा करून इनाम खात जाने.’[२५] या पत्रावरून असे दिसून येते की, तत्कालीन सेवा एकनिष्ठपणे करावी यासाठी श्री ची शपथ घालती आहे. तसेच या ४० बिघ्यातील गावगन्नाच्या जमिनीची प्रतवारी ही दिलेली आहे. तुम्ही सेवेमध्ये कोणत्याही प्रकारची चुक करू नये आणि हे सरशेटेपण तुम्ही वंशपरंपरेने सेवा करीत उपभोगित जाणे.

सदर पत्राचे अजून एक वैशिष्टये म्हणजे यात साक्षीदारांच्या साक्षी व निशाणी दिल्या आहेत. यामध्ये,

| | |
|---|---|
| १ शिवाजी भोसले प।। क।। तारगाव | १ आनंदराव देशमुख व पिलाजीराव वाजेगाव |
| १ सटऊजी इंगले प।। मौजे नाटोसी इबेलीत।। मरळी | १ सुलतानजी निकम प।। |
| १ वली पोमद व फकरा अलि नावाडी | १ आदु कुऱ्या |
| १ अंताजी नरहरी मु।। देशमुख भागो जी चौगला कारभारी | १ नाईकजी होले प।। व |
| १ विस्वनाथ भट बिन हरभठ जोसी प्र।। म।र | १ कोंडसेट शेटे प्रांत माार |

| | | |
|---|---|---|
| १ चाफाजी येलन खो।। तुबल मौजे कुसावडे | १ बहिरजी पामळकर प।। मौजे चचोली त।। याले | १ बाळूजी देशाई व कोंडजी चौगला व नाईकजी गुरव मौजे निवकणे[२६] |

यावरून असे दिसते की, त्यावेळच्या बलुतेदार व अलुतेदार यांच्या साक्षी किती महत्त्वाच्या आहेत. तसेच प्रत्येक साक्षीदारांने आपली खुण, निशाणी या पत्रावर उमटविलेली दिसून येते.

जंजिऱ्याचा सिद्दी मराठयांचा पिढयान्‌पिढया शत्रू होता. त्याने अनेक वेळा स्वराज्यात घुसून मोठया प्रमाणात लुट केली होती. या सिद्दीचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांनी केलेला दिसतो. परंतु तत्कालिन परिस्थितीमुळे सिद्दीचा पूर्ण बंदोबस्त होऊ शकला नाही. मराठयांच्या स्वातंत्र्ययुध्दात मराठयांचे सर्व लक्ष मोगल सैन्याकडे होते. त्यामुळे सिद्दी कोकण किनारपट्टीवर अधिक बलवान झालेला दिसून येतो. कोकण किनारपट्टीवरील गावांमध्ये त्याची मोठी दहशत होती. तो वेळोवेळी जंजिऱ्यातून बाहेर पडून या गावांत लुटालूट, जाळपोळ करून हानी पोहचवित असे. तसेच या गावांतील पिकांचे मोठे नुकसान करीत असे. सिद्दीच्या हल्ल्यामुळे गावे, धार्मिक स्थळे तसेच शेती संपदा, उदयोगधंदे ही असुरक्षित होती.

जंजिऱ्याच्या सिद्दीने इ.स. १७२७ मध्ये ब्रम्हेंद्रस्वामींच्या परशुरामाच्या मंदिरावर हल्ला केला होता.[२७] तसेच मोठया

प्रमाणात नुकसान केले होते. या घटनेचा बदला इ.स. १७३६ मध्ये चिमाजी आप्पा कोकणात स्वारी करून सिद्दीशी युध्द करून घेतलेला दिसून येतो. यामध्ये सिद्दीचा पराभव होऊन तो ठार झाला. ही वार्ता चिमाजी आप्पा यांनी सरदार द्वारकोजीराव पाटणकर यांना कळविल्यानंतर मे, १७३६ मध्ये सरदार द्वारकोजीराव पाटणकर हे चिमाजी आप्पांना पत्र लिहितात. या पत्रात सरदार द्वारकोजीराव पाटणकर असे म्हणतात की, '......जे शामलात व आपणांत युध्द जाहलें. शामलांकडील हजार दोन हजार माणुस ठार जाहलें व खासा सिदी सात पडला म्हणु(न) लिहिले.....'.[२८] येथे आपणांस असे दिसून येते की, या युध्दात सिद्दीकडील हजार दोन हजार सैन्य ठार झाले. तसेच सिद्दी सात हा ही या युध्दात ठार झालेला दिसून येतो. यावरून असे दिसून येते की, खुद्द चिमाजी आप्पा सिद्दीवरील विजयाचा वृत्तांत सरदार द्वारकोजीराव पाटणकरांना कळवितात. म्हणजेच सरदार पाटणकरांचे त्या काळातील महत्त्व अधोरेखित होते.

पुढे ते म्हणतात, '......या माघे राज्यातील सरदार व सरकारकून शामलावर चालोन गेले, परंतु ईस्वर त्यांस येश दिल्हे नांही गोसांवी यास येश आले. त्यावरून अतिसंतोष जाहला.....'.[२९] या अगोदर सिद्दी विरोधात अनेक मोहिमा विविध सरदारांनी काढल्या होत्या. परंतु यामध्ये कोणत्याही सरदाराला यश आले नव्हते. ते यश चिमाजी आप्पांना भेटल्याचा आनंद सरदार द्वारकोजीराव पाटणकरांना झालेला दिसून येतो. '......आम्ही गोसावी याचे सर्वस्व पदरीचे आंकित असों. सर्व मानअभिमान आमचा गोसांवियां खेरीज कोणास आहे यैसे नाही.....'.[३०] छत्रपती शाहू महाराजांच्या शेवटच्या कालखंडामध्ये पेशव्यांचे वर्चस्व किती वाढलेले होते, हे आपणांस दिसून येते. अनेक सरदारांनी पेशव्यांचे वर्चस्व मान्य करून ते त्यांच्या अंकित झालेले दिसून येतात. थोडक्यात मराठा सत्ता ही छत्रपती घराण्याकडून पेशव्यांच्या हाती गेलेली दिसून येते. या पत्रात शेवटी सरदार द्वारकोजीराव पाटणकर असे म्हणतात, '......आपणाजवल चीरंजीव आहेत गोसांवी त्यांचे

ममतेने चालवत आहेत. आम्हांस आपणांविरहीत दूसरा आर्थ आहे येसे नाहि.....'.[३१] सरदार द्वारकोजीराव पाटणकर यांचे चिरंजीव हे पेशवे दरबारी असलेले दिसून येते. त्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता, हे या पत्रावरून पहावयास मिळते.

श्री राज्याभिषेक शक ६८, दुर्मती नाम संवत्सर, माघ बहुल एकादशी, मंदवासर (दिनांक ४ फेब्रुवारी, १७४२) रोजी कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले यांनी सरदार नागोजीराव पाटणकर यांना सोयरिकीसाठी एक पत्र पाठविले. हे पत्र सरदार पाटणकर घराण्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. सोयरिकीसंदर्भात आपण राजश्री राणोजी घाटगे व राजश्री नागोजी घाटगे यांना पत्रे पाठविली आहेत. या पत्रात कोल्हापूरकर छत्रपती संभाजी महाराज पहिले म्हणतात, '....सोईरीकेचा शोध राजश्री राणोजी घाटगे यांकडे केला. हे वर्तमान भानजी पवार वाा तून याणी विदीत केला. तरी ये गोस्टीचे स्वामीस आगत्य आहे. हाली तुमच्या लिहिल्यावरून राणोजी घाटगे व नागोजी घाटगे यांसी पत्र पाठविली आहेत. तुम्ही ये गोस्टीची निश्चये करून ऊतर पाठवणे.....'.[३२] या पत्रावरून असे दिसून येते की, जो पूर्वीचा छत्रपती शाहू आणि कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले यांचेत झालेला इ.स. १७३१चा वारणेचा तह हा छत्रपती शाहूच्या निधनानंतर शिथील झालेला दिसून येतो. येथून पुढे आपणांस असे दिसून येते की, पाटण महालातील सरदार पाटणकर हे कोल्हापूरच्या गादीशी एकनिष्ठ झालेले दिसून येतात. खुद्द कोल्हापूरच्या छत्रपतींनी ही त्यांच्या घराण्याचे मोठेपण, त्यांचे कर्तृत्व लक्षात घेतलेले दिसून येते. त्यामुळे कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले हे सरदार नागोजीराव पाटणकर यांचेसोबत सोयरिक जुळविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले यांच्या महाराणी जिजाबाईसाहेब यांनी राजसबाई पाटणकर यांना वतनासंबंधी लिहिलेले सु।। ईसने अर्बैन मया अलफ, छ २६ जीलहेज (दिनांक २१ फेब्रुवारी, १७४२)

रोजीचे पत्र उपलब्ध आहे. वतनाच्या संदर्भात जे योग्य आहे, ते केले जाईल असे आश्वासन महाराणी जिजाबाईसाहेब राजसबाईंना देतात. या पत्राचा आशय पुढीलप्रमाणे, '.......वतनाचा प्रसंग लिहिला व सांगोन पाठवीला. ऐशास वतनदार पाटील कुलकर्णी हूजूर आल्या नंतर तुम्हांस आज्ञापत्र सादर होईल ते समई तुम्ही आपणाकडील कोणीतरी हूजूर पाठवून देणे. वतनाचा प्रसंग करीता भेटे विषई आपले समाधान असो देणे. बरहक असेल ते मानस आणीले जाईल. जाणिजे.....'.[३३] म्हणजेच महाराणी जिजाबाईसाहेब राजसबाईं पाटणकर यांना शब्द देतात की, जे वतनासाठी योग्य आहेत, ते केले जाईल. एखादया सरदार पत्नीस महाराणीने पाठविलेले पत्र निश्चित महत्त्वाचे आहे.

महाराणी ताराबाईनंतर कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले यांच्या महाराणी जिजाबाई यांनी १८व्या शतकात जी राजकीय कर्तबगारी दाखविली, याला इतिहासामध्ये निश्चितच महत्त्वाचे स्थान असलेले दिसून येते. महाराणी जिजाबाई यांच्या राजकीय मुत्सद्दीपणामुळे कोल्हापूरचे राज्य टिकलेले आपणांस दिसून येते. कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले राज्यकारभाराविषयी महाराणी जिजाबाईसाहेब यांच्याशी सल्ला मसलत करित होते. कारण तत्कालिन परिस्थितीमध्ये राजदरबारातील स्त्रियांना प्रत्यक्षात राजकारभारामध्ये किती सहभाग होता, याचा उल्लेख क्वचितच मिळतो. परंतु या पत्रातून असे दिसून येते की, राजघराण्यांतील स्त्रियां वेळप्रसंगी राजकारभारामध्ये सहभाग घेत होत्या. त्यांचा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असे. यातून महाराणी जिजाबाईसाहेबांचा मुत्सद्दीपणा दिसून येतो.

सरदार नागोजीराव पाटणकर आणि कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले यांचे संबंध किती दृढ होते, हे श्री राज्याभिषेक शक ६९, दुदुंभी नाम संवत्सर, अश्विन बहुल चतुर्दसी, मंदवासर (दिनांक २१ सप्टेंबर, १७४२) रोजीच्या पत्रावरून दिसून येते. कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले यांनी सरदार नागोजीराव पाटणकर यांना पत्र पाठवून त्यांच्या

तब्ब्येतीची विचारपूस केली होती, हे पुढील आशयावरून दिसून येते. ते म्हणतात, '......शरीरी समाधान नाही म्हणून लि।। तरी आरोग्य जालीयाचे वर्तमान लेहून पाठवणे......'.[३४] एखादया छत्रपतींला आपल्या सरदारांसोबत असलेला जिव्हाळा, त्यांचेतील सौहार्दपूर्णसंबंध आपल्याला येथे दिसून येतात.

या पत्रात पुढे छत्रपती संभाजी महाराज पहिले असे म्हणतात की, '.......पूर्वी तुम्हाकडील बोलीचाली हुजूर तारले तर्फेचे देसमुखीची आली होती. ते स्वामीस निवेदन आहे. यैशास सांप्रत बालाजी देसाई ताा तारले याची देसमुखी अनामत करून हुजूर ठेविली आहे......'.[३५] तर्फ तारळेचे देशमुख बाळाजी देसाई होते. त्यांची देशमुखी महाराजांनी काही कारणाने सरकार जमा केली होती. पण कारण कोणते, याविषयी आपणांस अधिक माहिती मिळत नाही.

याच पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे, '.....तरी पूर्वीलक्षुम खराडा या बराबर तुम्ही सांगोन पाठविली आहे. त्या प्रो।। साहित्य करून वतन प्रसंगाचे पूर्वील साहित्य जे काय असेल ते देऊन मातबर कारकून हूजूर पाठविणे......'.[३६] छत्रपतींना एखादया सरदारांच्या प्रती असलेला कळवळा, आपुलकी या पत्रातून पहावयास मिळते. तसेच तर्फ तारळेचे देशमुख बाळाजी देसाई यांची देशमुखी महाराजांनी काही कारणाने सरकार जमा केली होती. त्या संदर्भात काही बोलीचाली करावयाची असेल तर आपण आपला कारकून पाठवून द्यावा, असे महाराजांनी या पत्रात लिहिले आहे. म्हणजेच सरदार पाटणकर यांच्या कार्यकर्तृत्वाची उंची लक्षात घेऊन छत्रपती संभाजी महाराज पहिले यांनी स्वत:हून तारळे गावच्या देशमुखी संदर्भात चर्चा करण्यास निमंत्रण पाठविलेले दिसून येते.

कोल्हापूरच्या राजदरबारातील अजून एक महत्त्वाचे पत्र उपलब्ध आहे. ते म्हणजे कोल्हापूरच्या महाराणी ताराबाईसाहेब यांनी मौजे वाजेगाव परगणे पाटण येथील इनाम सरदार हिरोजीराव पाटणकर यांच्याकडे

पूर्वीपासून चालत आलेला आहे आणि तो तसाच चालू ठेवावा, म्हणून हुकूम केलेला आहे. सु।। खमसेन मया अलफ, छ २८ र।खर (दिनांक २६ मार्च, १७५०) रोजी लिहिलेल्या पत्रात त्या असे म्हणतात, '......मौजे वाजेगांव प्र।। पाटण यांसी आज्ञा केली ऐसीजे. मौजे मजकूर हा गांव राजश्री हिरोजीराव बीन हणमंत राव पाटणकर यांच्या वाटणीचा इनाम आहे. तो पूर्वीपासुन मशारनीलेकडे ईनाम चालत आले आहे. त्या प्रमाणे करार असे तरी मशारनीलेसी रूजू राहून सुदामत अमल सुरलीतपणे हुजूर येक (निष्ठ राहा) णे......'.[३७] प्रत्यक्षात राजघराण्यांतील स्त्रियां एखादया इनामा, वतनासंदर्भात हुकूम, आदेश देत असत, हे आपणांस या पत्रातून कळते. त्यामुळे कोल्हापूर रियासतीच्या दृष्टीने हे पत्र अंत्यत महत्त्वाचे आहे. वरील पत्रातून कोल्हापूर दरबारासाठी सरदार पाटणकर किती महत्त्वपूर्ण आहेत, हे लक्षात येते.

आरमार हे राज्याचे एक महत्त्वाचे अंग आहे. स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठया दूरदृष्टीने मराठी आरमाराचा पाया घातला. त्यांनी बरेच मोठे आरमार सागरी किनारपट्टीच्या रक्षणासाठी तयार केले. पुढे कान्होजी व तुळाजी आंग्रे यांनी हया आरमाराला बळकटी आणली. कान्होजींच्या मदतीला राणे, धुळप वगैरे सरदार होते. मराठा आरमारांनी त्यावेळी पोर्तुगीजांना चांगलेच जेरीस आणले होते. १८व्या शतकाच्या उत्तरार्धात सरदार पाटणकर घराण्यांतील बाबुराव साळुंखे व आनंदराव धुळप यांच्या आरमाराचा वचक युरोपियन जहाजांवर देखील होता.[३८] आपल्या जलद आरमारी हालचालीद्वारे त्यांनी इंग्रजांच्या नाकी नऊ आणले होते. यामुळे इंग्रजांनी मराठा आरमाराशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला होता, असे दिसून येते.

नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत सरदार पाटणकर घराण्यातील सटवोजी पाटणकर हे पेशव्यांच्या आरमारात सेवा करीत असलेले

दिसून येतात. श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या आरमाराचे सुभेदार बाजीराव बेलोसे यांनी राजश्री दिनकरपंत यांना इ.स. १७५२—५६ च्या आसपास पत्र लिहून सरदार सटवोजी पाटणकर यांच्या सरंजामाविषयी लिहिलेले होते. त्याचा आशय पुढीलप्रमाणे, '.....राजश्री सटवोजी सालोखे पूर्वीपासोन आरमारावर सेवा करितांत अगोधरही येकनीष्ठ पणे सेवा केली आहे हे आपणास अवगत आहे. यांचे बाप व भाऊ सर्व कुटूंब वीजयेदूर्गास होते तो अवलंब सोडून कुटूंब घेऊन श्रीमंतांचा आश्रये करून आले आहेत. तूर्त च्यातुर्मास वतनी गाव मौजे कुसी वाई देश येथे राहतील......'.[३९] यावरून आपणांस असे लक्षात येते की, सरदार पाटणकर घराण्यांतील अनेक पुरूष स्वराज्याच्या तसेच विविध राजदरबारामध्ये राहून कार्यरत होते. सरदार सटवोजी पाटणकर हे पूर्वीपासून पेशव्यांच्या आरमारावर सेवा करीत असून त्यांचे वडील व भाऊ यांनी विजयदुर्गकर आंग्रे यांची बाजू सोडून ते पेशव्यांच्या आश्रयी आलेले आहेत, असे बाजीराव बेलोसे यांनी सदर पत्रात नमूद केले आहे. या पत्रातून आपणांस नानासाहेब पेशवे आणि आंग्रे घराण्यातील संघर्ष पहावयास मिळतो.

पुढे ते पत्रात म्हणतात, '......च्यातुर्मासची बेगमी असावी यांकरीता रजा घेऊन माणसाचा समाचारास आले असेत. तेथोन श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी वीनंती करण्यास येतील. आपले दर्शन घेऊन सर्व विदीत करितील. तर यांचे सर्व प्रकारे अगत्य धरून श्रीमंताचे सेवेसी वीनंती करून सरंजाम करून दिल्हा पाहीजे. येवीशी बहूत काय लिहिणे......'.[४०] चातुर्मास काळात त्यांनी रजा काढून ते पेशवे पंतप्रधान यांच्या सेवेशी येतील व प्रत्यक्ष भेटीदरम्यान त्यांच्याशी सविस्तर चर्चा करतील. हे सर्व ग्राहय धरून श्रीमंतांना विनंती की, एखादा सरंजाम त्यांना मिळावा, यासाठी आपण काहीतरी प्रयत्न करावे, असे बाजीराव बेलोसे राजश्री दिनकरपंत यांचेकडे व्यक्त करतात. थोडक्यात, सरदार पाटणकर हे आंग्रेची बाजू सोडून पेशव्यांना मिळणार आहेत आणि त्याचा उपयोग भविष्यात पेशव्यांचे आरमार बलवान करण्यासाठी होऊ शकतो, ही भावना आपणांस पहावयास मिळते.

**कर्नाटक मोहिमेत सरदार जानराव पाटणकर यांचा पराक्रम:**

छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर मराठयांची राजधानी साताऱ्याहून पुणे येथे स्थलांतरित झाली. सरदार नागोजीराव पाटणकर यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र जानराव पाटणकर हे पाटण व इतर जहागिरींचे अधिकारी झाले. सरदार जानराव पाटणकर हे बहुतेक वेळा पुणे दरबारी असत. इ.स. १७५३ च्या सुमारास नानासाहेब पेशवे यांनी सरदार जानराव पाटणकर आणि इतर मराठा सरदारांच्या सहकार्याने कर्नाटकांत स्वारी करून श्रीरंगपट्टणपर्यंत चाल केली.[४१] बहुली ओनोरचा किल्ला घेताना सरदार जानराव पाटणकर यांनी अभूतपूर्व पराक्रम दाखविला. त्यांच्या पराक्रमामुळे हा किल्ला मराठयांना घेता आला.[४२]

इ.स. १७५६ मध्ये नानासाहेब पेशवे पुन्हा कर्नाटक प्रांत सर करण्यासाठी श्रीरंगपट्टणवर स्वारी केली होती. त्यावेळी म्हैसूरचा दिवाण नंजीराव हा बंड करून श्रीरंगपट्टणमध्ये स्वतंत्रपणे कारभार करीत होता.[४३] मराठयांनी श्रीरंगपट्टण शहराला वेढा घातला. पेशव्यांनी सरदार जानराव पाटणकर यांचा पूर्वीचा पराक्रम लक्षात घेऊन त्यांना एक हजार स्वाराचे प्रमुखत्व दिले होते.[४४] सरदार जानराव पाटणकर यांच्या पराक्रमामुळे दिवाण नंजीराव याने आपणास मराठयांवर विजय मिळविता येणार नाही, हे जाणून पेशव्यांशी तह केला. पांच लक्ष रूपये व काही प्रदेश ताब्यात दिला.[४५] सरदार जानराव पाटणकर यांच्या शौर्यामुळे मराठा सैन्याने शेरा परगणा काबीज केला. पावसाळा जवळ आल्याने पेशवे बाळाजी बाजीराव आपले सैन्य घेऊन पुणेस निघाले. तर काही सैन्य सरदार बळवंतराव मेहेंदळे यांच्या ताब्यात देऊन त्यांना उसकटा, बंगलोर, बाळापूर वगैरे प्रांत काबीज करण्यास कर्नाटकांत ठेविले.[४६] या सैन्यामध्ये सरदार जानराव पाटणकरांचा समावेश होता.

सरदार जानराव पाटणकर हे कर्नाटकांत राहिले. कडपाच्या नवाबांशी लढाई करून सरदार जानराव पाटणकर, मेहेंदळे आणि त्यांच्या सैन्याने उसकटा परगणा हस्तगत केला. पुढे अर्काटच्या नवाबाच्या

मुलखांतील चौथ व सरदेशमुखीबद्दल मागणी केली. आपला सरदार जानराव पाटणकर व इतर मराठा सैन्यासमोर निभाव लागणार नाही, हे ओळखून नवाबांने मुलखांतून अडीच लक्ष रूपये वसूल करून घेण्याची परवानगी मराठयांना दिली.[४७] कडपा व कर्नालच्या नवाबांनी एकत्र येऊन मराठयांविरोधात युध्द पुकारले. तेव्हा सरदार पाटणकर, बळवंतराव मेहेंदळे व त्याच्या सैन्याने नवाबाच्या सैन्याला पराभूत करून कडपा शहर लुटले.[४८] या युध्दात कडपाचा नवाब मारला गेला. सरदार जानराव पाटणकरांच्या नेतृत्वाखाली लष्करी तुकडीने दोन–तीन लढाया जिंकल्या. सावनुरच्या नवाबांशी लढाई करून सरदार जानराव पाटणकरांनी मराठा सैन्याची विजयी पताका सावनूर मध्येही फडकविली.[४९] ज्या उद्देशाने पेशव्यांनी मराठा सैन्य दक्षिणेत ठेवले होते, तो उद्देश सरदार पाटणकर आणि इतरांनी आपल्या पराक्रमाने सफल केला. यानंतर मेहेंदळे व सरदार जानराव पाटणकर सैन्यासह महाराष्ट्रात परत आले.[५०]

इ.स. १७५६ मध्ये पेशव्यांनी आपल्या आरमाराचे २ प्रमुख भाग केले. वसई, विजयदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेल, देवगड, रेवदंडा येथे आरमारी ठाणी घातली व आरमार खर्चाकरिता महाल लावून देण्यात आले.[५१] पेशव्यांतर्फे नाना फडणवीसाने आरमारी सुभ्याचा काही अधिकार सरदार पाटणकर घराण्यातील बाबुराव साळुंखे यांना दिले होते व आपल्या आरमारी महालाचा खर्च परस्पर भागविणे असा आदेश दिला होता.[५२] सरदार बाबुराव साळुंखे ऊर्फ पाटणकर यांसकडे उत्तर पेशवाईत दोन मोठी पाले, चार गुराबे आणि विसाहून अधिक गलबते होती.[५३] चांचेगिरीपासून बचाव करणे, समुद्रात फुटलेली जहाजे ताब्यात घेणे व समुद्रकिनाऱ्याचे संरक्षण करणे इ. कामे त्यांना करावी लागत असल्याचे दिसून येते.[५४] त्यांच्या मदतीला दळवी, गांजवे, राणे व इंदप ही मंडळी होती.[५५] सरदार बाबुराव साळुंखे ऊर्फ पाटणकर यांची नेमणूक अंदाजे काही हजार होनांची असावी, याबाबत अधिक माहिती उपलब्ध नाही. तर त्यांच्या कारभाऱ्यांचा म्हणजे राणे, धुळप हयांचा पगार अंदाजे दोन

हजार होनाचा होता.[५६] त्यांच्या आरमारातील सरतांडेलास १० होन, तांडेलास ७ होन तर खलाशास ४ ते ५ होन पगार दरमहा मिळत असे.[५७]

सरदार गोपाळराव पटवर्धन, बळवंतराव मेहेंदळे व मल्हारराव रास्ते यांनी इ.स. १७५८—५९ च्या दरम्यान म्हैसूरकरांचा प्रदेश काबीज करण्याची मोहिम आखली होती. म्हैसूरचा सेनापती हैदर अली याच्याशी बंगलूर, श्रीरंगपट्टण इत्यादी प्रदेशांत त्यांच्या लढाया चालू होत्या. यामध्ये सरदार नाथाजीराव पाटणकर हे आपल्या सैन्यानिशी सहभागी झाले होते हे आपल्याला दिनांक २२ डिसेंबर, १७५८ रोजीचे सरदार नाथाजीराव पाटणकर यांनी पेशव्यांना पाठविलेल्या पत्रातून दिसून येते. या पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे, '.....तेथे आज्ञा की खासा स्वारी तयार जाली आहे तरी फौजानिसी स्वार होऊन जलदीने येणे. (म्ह)णोन आज्ञा ऐसीयासी अम्हास फौज सुधा गलगलेचे मोकामी राजश्री मलहारराऊ रास्ते यांचे ताबीन केले.....'.[५८] सरदार नाथाजीराव पाटणकर हे आपल्या सैन्यासह मल्हारराव रास्ते यांच्या फौजेत तैनात होते. वरील पत्रातील मजकुरावरून असे दिसते की, सरदार नाथाजीराव पाटणकर आणि पेशवे यांच्यातील संबंध अधोरेखित होतात. पेशव्यांतर्फे केल्या जाणाऱ्या अनेक मोहिमांमध्ये सरदार पाटणकरांचा सहभाग असायचा, हे या पत्रातील मजकुरांवरून कळते.

सरदार नाथाजीराव पाटणकर आणि पेशव्यांतील संबंधाबाबतचे एक पत्र उपलब्ध आहे. या पत्राचा मजकूर पुढीलप्रमाणे, '......त्यास सावनुरची स्वारी पासोन जमाव सुधा मशारनुले पासी बागडीकोटी आहे. सध्या कुस्टगिरीचे शाहावरी रवाना केले आहे. तेथे जमाव सुधा आहो.....'.[५९] पेशव्यांनी सरदार नाथाजीराव पाटणकरांना तातडीने स्वार होऊन हुजूर बोलाविले होते. त्यावर आपण सध्या कुस्टगिरीच्या मोहिमेवर आहोत, असे सरदार नाथाजीराव पाटणकर पेशव्यांना कळवितात. यावरून असे दिसते की, पेशव्यांचा आणि पाटणकर यांच्यातील संबंध किती सलोख्याचे होते.

सरदार पाटणकर नेहमीच मराठयांच्या वतीने विविध मोहिमांमध्ये सहभागी झालेले दिसून येतात.

गोवळकोंडयाचा सुभेदार याकूब खान याने चिपळूणमधील हेळवाक घाटाच्या तोंडी आपला भलामोठा फौजफाटा आणला होता.[६०] यावेळी याकूब खानाने परशुराम देवस्थान लुटले होते. ही बातमी नानासाहेब पेशव्यांना कळताच त्यांनी सरदार नाथाजीराव पाटणकर यांना याकूब खानास रोखण्यासाठी पाठविले.[६१] तेव्हा सरदार नाथाजीराव पाटणकर यांनी याकूब खानच्या ताकदवर सैन्यापासून परशुराम देवस्थान व आजूबाजूच्या प्रदेशाचे रक्षण करून याकूब खानाचा पराभव केला. तेव्हा याकूब खानाने मराठयांशी तह केला. त्यावेळी सरदार नाथाजीराव पाटणकरांनी नानासाहेब पेशवे यांना पत्र पाठवून याकूब खानाकडून झालेल्या नुकसानीची भरपाई घ्यावी, असा सल्ला दिलेला दिसून येतो.[६२]

**उदगीर लढाई व सरदार पाटणकरांचा पराक्रम:**

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत इ.स. १७६० च्या जानेवारीत निजाम सलाबतजंग आणि सदाशिवरावभाऊ यांच्यात उदगीर मुक्कामी घनघोर लढाई झाली.[६३] या युध्दकाळातील श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांचे श्रीमंत सदाशिवराव भाऊ यांना पाठविलेले दिनांक ३० जानेवारी, १७६०चे पत्र उपलब्ध आहे. या पत्रातील मजकूरावरून आपणांस निजामावरील मोहिमेची माहिती मिळते. निजामाला कोणत्याही परिस्थितीत बुडवायचाच, असा निग्रह रघुनाथराव पेशवे यांनी व्यक्त केलेला दिसून येतो. मोगल म्हणजेच निजाम सैन्याला गुरूवार अथवा शुक्रवारी बुडवावे, असा मजकूर आढळून येतो. या पत्रात श्रीमंत रघुनाथराव पेशवे म्हणतात की, '.....तिही पक्षानी मोगल बुडीवासांच आहे. परंतु सिपायगिरीचे तेज फार आहे ऐसीयांसी केवल सफजंगी जेंव्हा करणे तेंव्हा करावि, परंतु तूर्त योजिला प्रकार गुरूवारी अथवा शुक्रवारी

केल्यास बरेच आहे....'.[६४] थोडक्यात मराठा सरदारांच्या पराक्रमावर विश्वास न ठेवता मुहूर्त पाहून पेशवे युध्द करीत होते, हे दिसून येते.

याच पत्रात मराठयांची युध्दरचना आणि लष्करी डावपेच याविषयी आपणांस माहिती मिळते. प्रत्यक्ष युध्दभूमीवरील हालचालीविषयीचे निर्देश व रचना याविषयी माहिती आपल्याला या पत्रातून मिळते. ती पुढीलप्रमाणे, '.....तोफखान्याच्या डावे बाजूस मोगलांचे उजवे बाजुस स्वामीची फौज, आमची तोफाचे उजवे बाजुस मोगलाचे डावे बाजुस याप्रमाणे उठावे मागे बाबुजी व मलहार नाईक ऊठवावे. त्या अलिकडे बाबजी नाईक आमचे उजवे हाते या प्रे ।। बंदोबस्त करितो.....'.[६५] रघुनाथराव व सदाशिवराव पेशवे हे वेगवेगळया बाजूंनी निजामावर हल्ले करण्यासाठी तयार होते. निजामाला सर्व बाजूंनी वेढून त्यावर हल्ला चढविण्याची व्यूहरचना आपणांस या पत्रातून पहावयास मिळते.

याच पत्रातील पुढील मजकूर अतिशय महत्त्वपूर्ण आहे. तो म्हणजे, '.....दमाजी गाईकवाड व शंकराजी घोरपडे व रायाजी पवार पाठवावयाविसी दोन तीनदा लिहिले परंतु त्याची रवानगी न जाली तरी ऐसे न करावे अगतय अगत्य शंकराजीस लवकर पाठवावे....'.[६६] म्हणजेच सदाशिवराव पेशवे यांच्याकडे अनेक मातब्बर सरदार होते. परंतु रघुनाथराव पेशवे यांची बाजू सदाशिवराव पेशवे यांच्या तुलनेने कमजोर होती. त्यामुळे त्यांनी सदाशिवराव पेशव्यांकडे दमाजी गायकवाड, शंकराजी घोरपडे व रायाजी पवार यांना पाठविण्यासाठी या अगोदर पत्रे लिहिली परंतु या पत्रांना सदाशिवराव पेशव्यांकडून म्हणावा तसा प्रतिसाद दिला गेला नाही. यावरून सदर युध्दप्रसंगी आपल्याला असे दिसून येते की, खुद्द पेशव्यांमध्ये ही दुफळी होती. एकमेकांवर कुरघोडी करताना पेशवे आपणांस दिसून येतात.

या पत्रातील पुढील मजकूर पाटणकर घराण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. कारण या पत्रात सरदार जानराव पाटणकर यांचा उल्लेख आलेला आहे आणि ते सदाशिवरावभाऊ पेशवे यांच्या फौजेत आहेत,

असे दिसून येते. सदर मजकूर पुढीलप्रमाणे, '.....स्वामी जवल पाटणकर आहेत, घाटगे वगै आहेत आम्हा कडील पथके मातबर कोणी आले नाहीत.....'.[६७] म्हणजेच खुद्द पेशव्यांनी ही सरदार पाटणकर यांची गणना मराठयांतील मातब्बर सरदारांमध्ये केलेली दिसून येते.

या लढाईत सरदार पाटणकर आणि इतर मराठा सरदारांच्या पराक्रमामुळे निजाम सलाबतजंग याचा दिनांक ३ फेब्रुवारी, १७६० रोजी पराभव झाला. सदाशिवरावभाऊ यांच्या कल्पक नेतृत्वाच्या बरोबरच सरदार जानराव पाटणकर आणि इतर सर्व सैन्याने महत्त्वाची कामगिरी बजावली. या युध्दात निजाम सलाबतजंगाला पराभूत व्हावे लागले व शरण येऊन त्याला मराठयांशी तह करावा लागला. या तहान्वये मराठयांस साठ लाख रूपये उत्पन्नाचा प्रदेश, अशीरगड व दौलताबाद हे किल्ले आणि विजापूर, बऱ्हाणपूर ही शहरे देण्याचे निजाम अली व त्याचा दिवाण विठ्ठल यांनी कबूल केले.[६८] या लढाईत बाजी हरी, द्वारकोजी राऊ पाटणकर, खंडेराव दरेकर, रायजी पवार, दमाजी गायकवाड, विंचूरकर जखमी झालेले दिसून येतात.[६९] नंतर पुणे मुक्कामी श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी सरदार जानराव पाटणकर यांना खास समशेर, कलगी व भेटवस्तू देऊन सन्मानित केलेले होते.

**पानिपतचे युध्दः**

उदगीर लढाईनंतर इ.स. १७६१ साली पानिपत येथे पेशवे व अहमदशहा अब्दाली यांच्यात पानिपतचे तिसरे युध्द झाले. महाराष्ट्रातील शेकडो सरदारांनी या युध्दात आपला पराक्रम दाखविला. सरदार पाटणकर घराण्यातील जानराव पाटणकर हे या युध्दात सहभागी होते. मोठया प्रमाणात रणसंग्राम होऊन अनेक मातब्बर सरदार धारातीर्थी पडले. पेशव्यांच्या चुकीच्या धोरणांचा फटका मराठा सैन्यास बसून मराठी सैन्यांची प्रचंड वाताहत झाली. यातून जे वाचले त्यांना परत फिरण्याशिवाय पर्याय राहिला नाही. यामध्ये सरदार जानराव पाटणकर हे ही परत आलेले दिसून येतात.[७०]

सरदार आप्पाजीराव पाटणकर यांना श्रीमंत नानासाहेब पेशवे यंचे नालबंदीचा हिशेब पुरा करण्यासाठी सु।। ईसने सितैन मया अलफ, छ १८ जीलकाद (दिनांक २२ जुन, १७६१) रोजीचे पत्र उपलब्ध आहे. या पत्रात नानासाहेब पेशवे असे म्हणतात, '......नालबदी समजावीस व्हावी लागते तरी पत्र पत्र पावताच तुम्ही खासे खासे स्वार होउन देखील कारकुन नलदूली वर येण.....'.[७१] याचा अर्थ श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचा मुक्काम नलदुर्गावर होता व हे पत्र मिळताच तातडीने स्वार होऊन सोबत कारकुन घेऊन नलदुर्गावर यावे, असे सुचवितात. महसूल तसेच जमाखर्चाबाबतीत पेशवे सरदार पाटणकरांशी सल्लामसलत करताना दिसतात, हे आपणांस या पत्रातून दिसून येते.

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या मृत्यूनंतर श्रीमंत माधवराव पेशवे पदावर आले. एकदा श्रीमंत माधवराव पेशवे आणि नारायणराव पेशवे हे बंधू छताच्या तंबूत बसले असता मस्तीत आलेल्या हत्तीने त्यांच्या रोखाने चाल केली आणि त्याच वेळी त्यांच्या शेजारी बसलेल्या खंडेराव दरेकर व सरदार हिरोजीराव पाटणकर यांनी हत्तीवर हल्ला करून पेशवे बंधूचा बचाव कसा केला याचे वर्णन आपणास पेशवेकालीन बखरीमध्ये दिसून येते. या बखरीतील मजकूर पुढीलप्रमाणे, '......व्हा येकला दिवस सरकारची स्वारी दरबाराचे चादणित बसली असता तेथे जवल खंडेराव दरेकर व हिरोजीराव पाटणकर बसले होते. त्या समई लस्करात सरकारचा हती मस्त होता तो सुटला त्या हतीच्या पाठीमागे शेकडो मनुष्ये गडेकरि माहात वगैरे धावत आहेत. भाले टोचीतात चीरक्या दारूच्या सोडितात परंतु हती कोणाच्या ने आटपत नाही. नीट हतीने चाल सरकारचे डेऱ्या वर केली त्यसमई उभयेता बंधु श्रीमंत बसले होते. हती समोर पाहताच नारायणराव साहेब उठले. तेंव्हा रावसाहेब यांणि हतात धरून खाली बसविले आणि सांगीतले कि हतीच्या पायी आपला मृत्यु नसला तर या हतीच्याने आपले काही व्हावयाचे नाही, असे म्हणुन बसवीले ईतक्यात हती चादणीचे तणाव्या पासी येऊन भिडला. ईतक्यात पाठीमागे सेकडो मनुष्य

भाले बर्च्या घेऊन लागले आहेत. ते पाहून चादणी नजीक येतोअसे जाणुन खंडेराव दरेकर व हिरोजीराव पाटणकर ऊभयेता धाऊन गेले. ते वेलेस पाटणकर याचे हातात कटार होती व दरेकर याचे हातात साग होती. पाटणकर याणि कटार राखीलीती हतीच्या गंडस्थळाच्या खाली सोंडेत च्यार बोटे आत घुसली. दरेकर साग हतीचे कानामागे लागली. हतीच्या कारागिर जाहाली त्याणे हती माघारा फीरला तेंव्हा भालेकरी होते. त्याणि चोही कडुन भाले टोचुन हती ऊभा करून वर्ता चढला. मग हती ठाणावर नेला ईकडे श्रीमंत याणि पाटणकर यांस चौघडा दिला व दरेकर यांस सरलस्करी सांगीतली. या प्रो।। बक्षीसे देऊन बारामतीकरांची मेजबानी घेऊन स्वारी पुण्यास यावयास नीघाली.....'.[७२] या बखरीतील उताऱ्यावरून आपणांस सरदार पाटणकर आणि पेशवे यांच्यातील संबंध लक्षात येतात. कोणत्या विषयाबाबत सरदार पाटणकर पेशव्यांशी चर्चा, मसलत करीत होते, हे मात्र आपणांस कळत नाही. तरीही पेशव्यांवर आलेले हत्ती संकट सरदार पाटणकर आणि खंडेराव दरेकर यांनी पराक्रमाच्या जोराव परतून लावलेले दिसते.

इ.स. १७६३ मध्ये रघुनाथराव यांनी निजामावर स्वारी केली. त्यावेळी सरदार जानराव पाटणकर हे श्रीमंत माधवराव पेशवे यांच्याबरोबर त्या स्वारीत होते. रघुनाथराव आणि निजाम यांची राक्षसभुवन येथे गाठ पडून युध्द सुरू झाले. त्यावेळी श्रीमंत माधवराव पेशवे व सरदार जानराव पाटणकर हे आपल्या निवडक लोकांसह अलीकडेच थांबून युध्दाची बातमी काढीत होते.[७३] या लढयात निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याच्याकडून रघुनाथरावाचा पराभव निश्चित आहे, हे समजल्यावर माधवराव पेशवे यांनी सरदार पाटणकर आणि इतर जेष्ठ सरदारांचे मत विचारले असता सरदार जानराव पाटणकर यांनी असे सुचविले की, 'श्रीमंत आपली इच्छा असेल तर आम्ही सर्व एकजुटीने शत्रुपक्षावर चाल करून त्यांची धुळधाण करायला तयार आहोत.'[७४] यावर माधवराव पेशवे यांनी निजामावर चालून जाण्याचा निर्णय घेतला व यात निजामाचा मोठा पराभव झाला.[७५] यातून आपणांस सरदार

पाटणकर यांच्या ठायी असलेला आत्मविश्वास दिसून येतो. मराठा सरदार एकत्र येऊन बलाढय अशा निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याचा पराभव करू शकतो, हे प्रामुख्याने सरदार जानराव पाटणकर यांनी आपल्या शौर्याने दाखवून दिलेले दिसनू येते. तसेच सरदार पाटणकर यांची समयसूचकता, अचूक निर्णयक्षमता, योग्य मार्गदर्शन करण्याची क्षमता यातून दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराजांनी सरदार पाटणकरांना पाटण परगण्यातील दोन गावांचे इनाम दिलेले होते. ते इनाम श्रीमंत माधवराव पेशवे यांनीही चालू ठेवावे अशी विनंती सरदार आपाजीराव पाटणकर, सरदार बाबूराव पाटणकर आणि सरदार धारराव पाटणकर यांनी केली होती. तेव्हा त्यांची विनंती पेशव्यांनी मान्य केलेली आपणांस दिनांक १६ एप्रिल, १७६३ रोजीच्या पत्रात दिसते. या पत्रात माधवराव पेशवे असे म्हणतात, '.....मौजे पांतले व मौजे बेलवडे त।। पाटणखोरे हे दोन्ही गाव इनाम पूरवी कैलासवासी माहाराज राजाराम साहेबी इनाम देऊन पत्रे करून देऊन चालविले. त्याप्रमाणे कैलासवासी शाहू माहाराज याणिही पत्रे करून दिल्ही आणि चालविले व जिल्हेदाराचीही पत्रे येवीसिच आहेत. त्या बरहूकूम साहेबी आपली पत्रे भोगवटीयास करून दिल्ही पाहिजेत, म्हणुन त्याज वरून पेसजीचे भोगवटी व पत्रे मनास आणुन तुम्हास हे पत्र सादर केले आहे.....'.[७६] या पत्रातील मजकूरावरून छत्रपती राजाराम महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्याप्रमाणेच पेशव्यांचा सरदार पाटणकरांवरील विश्वास वृध्दिगंत झालेला दिसून येतो.

सरदार जानराव पाटणकर हे पेशव्यांच्या पदरी असलेले मातब्बर सरदार होते. हे आपणांस इ.स. १७६७ च्या माधवराव पेशवे यांनी सरदार जानराव पाटणकरांना पाठविलेल्या पत्रावरून समजते. या पत्रातील आशय पुढीलप्रमाणे, '......विशेष राजश्री त्रिंबकराव दाभाडे सेनापती स्वारीस बाहेर निघाले आहेत तरी तुम्ही आपले जमाव सुधा तयार होऊन त्याजकरी चाकरीस जाणे....'.[७७] म्हणजेच सेनापती त्र्यंबकराव दाभाडे हे स्वारीस बाहेर पडणार आहेत. तरी तुम्ही आपल्या फौजेनिसी सेनापती दाभाडे यांचेकडे जाणे.

असा हुकूम माधवराव पेशवे हे सरदार जानराव पाटणकरांना देतात. पुढे ते म्हणतात, '......सालास हुजूर चाकरीस येत आस्तां त्यास हाली साल मजकुरी सेनापती कडे चाकरीस सरंजाम सुधा पत्र दर्शनी निघोन जाणे जाणिजे.....'.[७८] थोडक्यात श्रीमंत माधवराव पेशवे हे सरदार जानराव पाटणकर यांना सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यांचेकडे आपल्या जमावानिसी चाकरीस जाणेबाबत आज्ञा करताना दिसून येतात. म्हणजेच सरदार पाटणकर यांना एखादया सेनापतीकडे गुंतवून न ठेवता माधवराव पेशवे त्यांच्या कर्तृतवाला वाव देण्यासाठी त्यांना विविध मोहिमामध्ये पाठवित. जेणेकरून त्यांच्या युध्दकौशल्याचा व एकनिष्ठतेचा उपभोग राज्यवाढीसाठी व्हावा, असे आपणांस दिसून येते.

इ.स. १७६७ साली माधवराव पेशवे स्वत: कर्नाटक स्वारीवर जातात. या मोहिमेत ते सरदार जानराव पाटणकर यांना मुद्दाम घेऊन गेले होते. कारण सरदार जानराव पाटणकर यांचे निर्विवाद युध्दकौशल्य होय. या मोहिमेत शेरा, उसकटा वगैरे प्रांत घेऊन हैदर अलीपासून ३० लक्ष खंडणी व इतर नवाबापासून बहुत द्रव्य घेऊन ते परत येतात.[७९] यातून असे दिसून येते की, प्रत्येक मोहिमेमध्ये सरदार पाटणकरांचा समावेश होता. सरदार पाटणकर यांनी आपल्या कार्यतत्परतेच्या आणि पराक्रमाच्या जोरावर हैदरअलीलाही तह करण्यास भाग पाडलेले दिसून येते.

श्रीमंत माधवरावांच्या मृत्यूनंतर नारायणराव पेशवे यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. काही दिवसांतच नारायणराव पेशवे यांची शनिवारवाडयात गारद्यांकडून हत्या करविण्यात आली. ज्यावेळी गारदी वाडयात घुसले होते तेव्हा ही बातमी पेशवाईचे कारभारी हरिपंत फडके यांच्या कानावर आली. त्यांनी या विषयावर मसलत करण्यासाठी सर्व सरदार, मानकरी, मुत्सद्दी पेशव्यांच्या बचावाचा विचार करण्याकरिता कोतवाल चावडीवर पाचारण केले. यामध्ये सरदार जानराव पाटणकर व आपाजीराव पाटणकर हेही उपस्थित होते. याशिवाय सखारामबापू, मोरोबादादा फडणीस, बजाबा पुरंदरे, नाना फडणवीस, मालोजी निंबाळकर, आनंदराव रास्ते, मालोजी घोरपडे, या विषयावर

विचारविनिमय करू लागले.[८०] ते सर्वजण शनिवारवाडयात हत्यारांसमवेत शिरून गारद्यांवर हल्ला करण्याच्या विचारात होते. परंतु नाईलाजस्तव त्यांना गारद्यांविरूध्द शस्त्र वापरता आले नाही. हल्ला केल्यास गारदी आत काही बऱ्या—वाईट गोष्टी करतील म्हणून हा विचार रहित झाला. यासंदर्भात उत्तर पेशवाईत काळातील बखरवजा टिपण उपलब्ध आहे. ते पुढीलप्रमाणे,

'इकडे शहरामध्ये मोठी हूल पडली. त्यामुळे सरदार तयार होऊन आले ते कोण कोण? अगोदर हरिपंत फडके घोडयावर स्वार होऊन, वाडयापाशी येऊन, उभे राहून पहातात तो गारदी मोठे चवताळले, निष्ठूर झाले, असें पाहिले. हे पाहून हरिपंत माघारे फिरले. तसेच सरदार मोठे मोठे व उमराव आले. आपाजीराव पाटणकर, खंडोजी जगताप, रास्ते आनंदराव, गणपतराव दुसरे—मामा, त्रिंबकराव, आपा बळवंतराव, गोविंदराव गायकवाड, भवानराव प्रतिनिधी, मालोजी घोरपडे, मालोजी निंबाळकर, आणखी पागा हुजुरांतील, सखारामबापू, बजाबा पुरंदरे, मोरोबादादा फडणीस, हरिपंत फडके, आनंदराव जिवाजी, राघोजी आंगरे, नाना फडणवीस, बाळाजीपंत दामले, पानसे असे किती गणतीस धरावे? असे सर्व मिळोन बुधवारचे चावडीवर जमा झाले. तेंव्हा तेथे जमा होऊन विचार करितात, ''आता उपाय कोणता करावा?'' तेंव्हा सारे सरदार व पागे म्हणतात, ''वाडयावर हल्ला करूं आणि गारदी मारून बाहेर काढूं, गारद्यांचा हिशेब आम्हापुढे तो काय?'' अशी मसलत करितात, ती मसलत बापूंचे ध्यानांत येईना, कारण ''राव वाडयात गुंतले आहेत, तेंव्हा आम्ही बाहेरून हल्ला करण्यास जाऊं तर ते गारदी वाडयात एकादा अनर्थ करितील. यासाठी हल्ला करितां येत नाही. वाडयांतील खर बाहेर समजत नाही.''[८१] या बखरीवजा टिपणातून तत्कालिन परिस्थिती आणि दिग्गज सरदारांमध्ये सरदार पाटणकर यांचा असणारा समावेश पहावयास मिळतो. म्हणजे प्रत्येक संकटसमयी सरदार पाटणकर हे मदतीस गेल्याचे दिसून येतात. त्यांच्याशी सल्लामसलत केली जात असे, हे आपणांस दिसून येते.

नारायणराव पेशवे याच्या हत्येनंतर सवाई माधवराव गादीवर आले होते. श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांना पेशवेपद हवे होते. परंतु बारभाई कारभाऱ्यांनी रघुनाथरावाविरूध्द कट करून सवाई माधवरावास पेशवाईची वस्त्रे आणली. रघुनाथराव पेशवे तेव्हा गुजरात येथे होते. फितुर रघुनाथरावाच्या बंदोबस्तासाठी नाना फडणवीस व इतर मुत्सद्दयांनी हरिपंत फडके यांना ३७ हजार स्वार देऊन गुजरातेत पाठविले व त्यांच्याबरोबर सरदार जानराव पाटणकर या अनुभवी सरदारांस जाण्यास सांगितले.[८२] तेव्हा वासदा येथे रघुनाथराव व हरिपंत आणि सरदार जानराव पाटणकर यांच्या सैन्याची गाठ पडली आणि मोठी लढाई सुरू झाली. या युध्दात सरदार पाटणकर यांच्या पराक्रमामुळे रघुनाथरावांचा पराभव झालेला दिसून येतो.[८३]

यासंदर्भात इ.स. १७७४ सालीचे एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रात सवाई माधवराव हे सरदार जानराव पाटणकरांना लढाईत मर्दुमकी गाजविल्याबद्दल शाबासकी देतात. या पत्रात श्रीमंत रघुनाथराव पेशवे आणि सवाई माधवराव पेशवे यांच्यातील सैन्यात युध्द होऊन रघुनाथराव पेशव्यांचा पराभव होतो. या युध्दात सरदार जानराव पाटणकर यांनी अभूतपूर्व कामगिरी केली. या पत्रात सवाई माधवराव पेशवे असे म्हणतात की, '......तिर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याज कडील व ईकडील फौजेची लडाई जाली. त्यांचा मोड होऊन पळून गेले. तुम्ही सरदार लोकांनी फार चांगली लडाई जमऊन मोठी शर्त केली म्हणून राजश्री हरी बामण याणी लिहिले. त्या वरून संतोष जाहाला. तुम्ही सरकारचे येकनिष्ठ चाकर. पूर्वी पासून निष्ठेने सेवा करीत आलात. बहूतच सांप्रतही सेवा मर्दूमकी केलीत. शाबास.....'.[८४] या पत्रावरून असे दिसून येते की, सरदार पाटणकर यांच्या पराक्रमामुळे रघुनाथरावांचा पराभव झाला. याबाबत हरीपंत फडके यांनी पेशव्यांना कळविल्यावर पेशव्यांनी प्रोत्साहनपर पत्र पाठविलेले दिसून येते.

कर्नाटकातील अनेगुंदी संस्थानचे राजे राजश्री बीरव रमन देवराव हे पुणे मुक्कामी आले होते. या मुक्कामाहून पाटण मुक्कामी

असलेल्या सरदार शामराव पाटणकर यांना सरदार जानराव पाटणकरांच्या सांगण्यावरून पत्र लिहितात. ते म्हणतात, '.....आपणा कडील वर्तमान व कितेक ऊमेद्वारी विषई राजश्री जानराव पाटणकर यांणी कतेक गोष्टी सांगीतल्या. त्यावरून हे पत्र आपणांस लिहिल आहे.....'.[८५] पेशव्यांचे कारभारी नाना फडणीस व सखाराम बापू यांच्या मदतीने सरदार आप्पा बळवंत यांच्याबरोबर दहा हजार फौज व तोफखाना देऊन आपली स्थापना अनेगुंदी संस्थानात करावी अशी योजना केल्याचे बीरव रमन देवराव यांनी म्हटले आहे. ते लिहितात, '.......राजश्री नाना फडणीस व बापु या ऊभयतानी दहा हजार फौज व तोफा देऊन आपा बलवंतराव यांसी आज्ञा केली आहे की, आमची स्थापना संवस्थानात करावी आणि पुढे जावे या प्रो।। करार जाहला आहे.....'.[८६] तसेच त्यावरून सरदार शामराव पाटणकर यांना आपले खाजगीत पाच हजार स्वार व पायदल यांचे नेतृत्व देतात. आपल्या राज्यात अष्टप्रधानाची पदे आहेत, त्या दृष्टीने आपण भेटीस यावे असे शेवटी कळविण्यात आले. ते लिहितात, '.....त्या वरून आम्ही आपली खासगत पांच हजार स्वांर व पायदल याचा बंदोबस्त करित आहो. यैसीयासी आपला मनोदये असील्यास अष्टप्रधानाची पदें आहेत व कितेक रोजगार आहेत. तर आपण भेटीस यावे म्हणजे सर्व गोष्टी घडोन येतील.....'.[८७] म्हणजेच या पत्रावरून असे दिसून येते की, सरदार पाटणकर यांच्या पराक्रमाची कीर्ती सवदूर पसरली होती. अनेगुंदी संस्थानाचे राजे सरदार पाटणकर यांच्या पराक्रमावर विश्वास ठेवून अष्टप्रधान मंडळामध्ये सहभागी व्हावे, अशी इच्छा बाळगताना दिसून येतात.

येथे आपणांस असे दिसून येते की, छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानाची निर्मिती केली. परंतु पुढे अष्टप्रधान मंडळ लुप्त झालेले दिसून येते. पेशवे हे बलाढय होऊन नंतरच्या काळात कारभारी यांचे प्रस्थ दिसून येते. परंतु अष्टप्रधान मंडळाची रचना इतर जे नव राज्य स्थापन करू इच्छितात, अशा अनेक भारतातील राजांनी स्विकारलेले दिसून

येते. यातच छत्रपती शिवाजी महाराजांची कारभार करण्याची पध्दत तसेच दूरदृष्टीपणा आपणांस पाहावयास मिळतो.

सु।। समान सबैन मया अलफ, छ ३ जीलकाद (दिनांक ४ डिसेंबर, १७७७) रोजीचे एक महत्त्वपूर्ण पत्र उपलब्ध आहे. या पत्रामध्ये सवाई माधवराव पेशवे हे सरदार जानराव पाटणकरांना फौजफाटयासह तयार होऊन हुजूर येण्याची आज्ञा करतात. हे आपल्याला पुढील मजकूरावरून समजते. तो मजकूर पुढीलप्रमाणे, '.......विशेष तुम्हास जाऊन फार दिवस जाले......'.[८८] सवाई माधवराव पेशवे यांची स्वारी तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरास असलेली पुढील मजकूरावरून दिसून येते. '......सरकारची स्वारी तुंगभद्रा ऊतरून दक्षण तीरास आली. तुम्ही पत्र पावताच सरंजाम सुधा तयार होऊन हूजूर लस्करात येणे.....'.[८९] सवाई माधवराव पेशवे यांच्या लग्नात सरदार जानराव पाटणकर हे उपस्थित होते. त्या शाही लग्न सोहळयाचे निमंत्रण त्यांना मिळाले व तेथे त्यांचा योग्य तो आदरसत्कार झाला.[९०] थोडक्यात, वरील पत्रावरून असे दिसून येते की, पेशव्यांच्या ठायी सरदार पाटणकरांविषयी असणारे प्रेम. तसेच पेशव्यांनी विवाहप्रसंगी सरदार पाटणकरांचा उचित सन्मान केलेला दिसून येतो.

उत्तर पेशवाई कालखंडात दिनांक २४ जानेवारी, १७८१ रोजी कुर्मगड मराठयांनी पराक्रमाने लढून टिपूकडून मिळविला[९१] व नंतर सदाशिवगडाचा (गोवा) ताबा मिळविण्यासाठी त्या किल्ल्याच्या किल्लेदाराकडे संधान बांधले.[९२] पेशव्यांचे आरमार बाबुराव पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली कारवार प्रांती डेरेदाखल झाले. या आरमारात दोन पाल, चार गुराब आणि वीसहून अधिक गलबते होती.[९३] त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली मराठा आरमारांनी चांगली कामगिरी बजावली. पुढे इंग्रजांना सुरतेहून रसद मिळते ही बातमी पेशव्यांचे कारभारी नाना फडणवीसांना कळली, तेव्हा त्यांनी दिनांक १० ऑगस्ट, १७८१ रोजी हुकूम काढून व सरदार बाबूराव पाटणकर व आंग्रे घराण्यातील प्रमुख सरदार नाईक निंबाळकर, हरजी नाईक या आपल्या विश्वासू

मानकऱ्यांस इंग्रजांचा बिमोड करण्यास तसेच सुरत व मुंबईच्या सागरी किनारपट्टीची नाकेबंदी करण्यास त्वरित फर्मावले.[९४] या हुकूमावरून असे दिसून येते की, मराठी आरमाराची शक्ती वाढीस आंग्रे पाठोपाठ सरदार पाटकणर यांचा मोलाचा वाटा होता. इंग्रजाच्या आरमारी सामर्थ्याला सरदार बाबुराव पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली मिळालेले एक आव्हान होते, असे आपणांस दिसून येते.

श्रीमंत सवाई माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत इ.स. १७९१ या साली परशुरामभाऊ पटवर्धन आपल्या सैन्यासह सदाशिवगडानजीक असताना त्यांच्या मदतीला सरदार बाबुराव पाटणकर यांच्या अधिपत्याखाली मराठयांचे आरमार काळया नदीतून तेथे आले. उभय सैन्यांनी एकत्रित होऊन पोर्तुगीजांवर आक्रमण केले, पण सरदार बाबुराव पाटणकर यांच्या पराक्रमामुळे आपला टिकाव लागणार नाही, हे पोर्तुगीजांनी जाणले होते. तेव्हा गोव्याच्या गव्हर्नर फ्रन्सिश्कु द कुन्य सिनेझिरा यांच्या मध्यस्थीने पेशव्यांतर्फे परशुरामभाऊंशी निळू नाईक–देसाई यांच्यामार्फत तह घडवून आणला.[९५] या तहातंर्गत पोर्तुगीजांवर वचक बसवून सरदार बाबुराव पाटणकर यांनी बाणकोटपासून गदगपर्यंतचा मुलुख मिळवून त्याचा कब्जा घेतला.[९६] नाना फडणवीसांच्या गोवा गव्हर्नर यांस लिहिलेल्या दिनांक २६ जानेवारी, १७९१ च्या पत्रात सरदार बाबुराव पाटणकर यांचा उल्लेख येतो. त्या पत्राचा 'सदाशिवगड, गोवा हा आतील सर्व वस्तूंसह बाबुराव साळुंखे यांच्या हवाली करण्याचा हुकूम आपण आपल्या सैन्याला द्यावा,'[९७] याबाबतचा तपशील सापडतो. या पत्रातील मजकूरावरून सरदार बाबुराव पाटणकर यांचे कर्तृत्व व कार्यपध्दती आपणांस दिसून येते. थोडक्यात सरदार पाटणकरांचे मराठा आरमारातील महत्त्व येथे अधोरेखित होते.

किल्ले जयगड व गुणवंतगड यांच्या सरहद्दीनजीकच्या रहदारीच्या दस्तकांसबंधी सिद्दी इब्राहिम खॉ यास कोल्हापूरचे सरलष्कर नारायणराव पाटणकर यांचे इ.स. १७९५ नंतरचे उपलब्ध आहे. या

पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे, '......छ दौलत येकबालपनाह शौकत व हशमत दस्तगाह अर्जीदील येखलास नारायेणराव पाटणकर सरलस्कर बाअद ज सलाम........'.[९८] पुढे ते म्हणतात की, '........किले जयेगड ताअलूके सुधा व किले गुणवंतगड ताआलूके सुधा ईज्यानीबा कडे आहेत. त्यासाअं शौकतपनाहाची सरहद नजदीक आहे. येबायें सबब खत निगारीष केले. असे जे हर येक बाबे किलेदारास काम रूबकार जाहालेसआं येकबालपनाहानी सरहदचे आमलदारास हुकूम करून फुस्तपना करावावा.....'.[९९] या पत्रातून असे दिसून येते की, कोल्हापूर दरबारातील सरदार पाटणकर यांचे स्थान अधिक बळकट व महत्त्वपूर्ण होते.

पेशव्यांच्या दक्षिण मोहिमेत म्हैसूरचा सिंह म्हणून प्रसिध्द असलेल्या टिपू सुलतानाविरूध्द बदामी येथील युध्दात सरदार जानराव पाटणकरांनी पुन्हा एकदा आपले शौर्य दाखवून दिले. त्यांच्या कुशल नेतृत्वाखालील मराठी सैन्याच्या एका तुकडीने टिपूच्या सरदाराकडून बदामीचा किल्ला काबीज करून किल्ल्यावर निशाण फडकविले[१००] व टिपूकडून बासष्ट लक्षाची खंडणी वसूल करून सरदार पाटणकरांनी पेशव्यांना मिळवून दिली.[१०१] तसेच सरदार पाटणकर यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर अर्काट व सावनूरच्या नवाबासही त्याचे गेलेले राज्य पुन्हा सन्मानाने मिळवून दिले.[१०२]

इ.स. १८००–१८१८ या दरम्यानचे सरदार पाटणकर घराण्यांतील परंतु आपल्या कर्तृत्वाने करवीर रियासतीच्या सरलष्कर पदापर्यंत पोहचलेले नारायणराव पाटणकर यांना नवाब आबीद यारजंग यांनी पाठविलेल्या पत्राचा उल्लेख आढळतो. या पत्रात नवाबांनी सत्वर आपल्या जमावानिशी यावे म्हणून पाटणकरांनी लिहिले होते. पत्रातील शब्द अनेक ठिकाणी अस्पष्ट झाल्याने पत्राचा पूर्ण अर्थबोध होत नाही. पण नवाबसाहेब सरलष्कर नारायणराव पाटणकर यांना आपला 'भाई' समजत होते, असे या पत्रावरून स्पष्ट होते. या पत्राचा मजकूर पुढीलप्रमाणे, '.....दरिविला आपण खत पाठविले. ते पोचून लिहिले कैफीयेत माळूम जाहाले. आम्हास सत्वर जमते

सुधा यावे म्हनोन तरी आमचे इरादा तो जीव माहाराज राजा माहा+++++राजा माहाराजाचे सेवेत लिहिले असो. येविसी आज्ञापत्रे येथील त्या प्रो ।। अमलात येईल. आपणांस आम्ही भाई एसे समजत असो.....'.[१०३] म्हणजेच सरदार पाटणकर यांचे इतर नवाबांशी सलोख्याचे संबंध होते. या कौटुंबिक संबंधामुळे त्यांचे स्थान अधिकाधिक भक्कम झालेले दिसून येते.

सरदार पाटणकर घराण्यांतील आपाजीराव पाटणकर हे ही एक कर्तृबगार व्यक्तिमत्त्व होते. त्यांना त्यांच्या कर्तृत्वाबद्दल पेशव्यांकडून खोपोली, खंडाळा, किल्ले राजमाचीच्या रोखाने काही इनान मुलुख मिळाला होता.[१०४] ते पेशव्यांच्या आज्ञेने मुलूखरक्षण व घाटमार्गे येणाऱ्या शत्रूंचा बंदोबस्त करायचे.[१०५] सरदार आपाजीराव पाटणकर हे पेशव्यांकडे पुणे दरबारी असत. इंग्रज—मराठा पहिल्या युध्दात खंडाळा घाटात सरदार आपाजीराव पाटणकर यांनी मोठे शौर्य दाखविले होते. त्यामुळे इंग्रजांना मिळणारी रसद वेळेवर पोहचू शकली नाही. इंग्रज फौज कमजोर पडली आणि पेशव्यांची राजधानी पुणे जिंकण्याचे त्यांचे स्वप्न धुळीस मिळाले.[१०६] इंग्रजांविरूध्द मराठयांच्या एकमेव विजयात सरदार पाटणकर घराण्यांचे योगदान मोठे आहे, हे आपणांस वरील घटनेनंतर कळून येते.

श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांना सरदार आप्पाजीराव पाटणकर यांनी इ.स. १८०२ साली एक लिहिलेले एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रात मुंबईचे गव्हर्नर जोनाथन डंकन यांचे पत्र आल्याचे व ते पेशव्यांकडे पाठविल्याचे सरदार आप्पाजीराव पाटणकरांनी म्हटले आहे. ते लिहितात, '.....विशेष अजम मेस्त्र ईजराव्यल जोनाथन डंकन जनराल जंजीरे मुबई याचे पत्र आले. तेच सेवेसी पाठवील आहे......'.[१०७] या पत्रामध्ये पुढे असे दिसून येते की, सरदार आप्पाजीराव पाटणकर यांनी इंग्रजांचे रसदीचे बैल अडवून ठेवले होते. त्याच्या सोडवणूकीविषयी गव्हर्नराने एक भला गृहस्थ व चार प्यादे पाठविल्याचा निर्देश या पत्रात आहे. '.....तेथे त्याज कडुन भला माणूस व च्यार असामी प्यादे अले होते. त्यचे बोलणे जरबेचे पडले......'.[१०८]

पुढे श्रीमंत बाजीराव पेशवे दुसरे यांनी मार्गदर्शन करावे तसेच आदेश देण्यासंबंधात लिहितात. '......त्याचे उत्तर दिल्हे कि आज्ञे सिवाय बैल जाऊ देता येत नाही. सवीस्तर समजावे म्हणोन विनंती लिहिली असे. येथील भरण्याचा विचार स्वामीस विदीतच आहे. आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणुक करिन सेवेसी......'.[१०९] वरील पत्रातील मजकुरावरून असे दिसून येते की, सरदार पाटणकर यांचेवर सोपविलेली जबाबदारी ते प्राणपणाने लढून पार पाडीत असत. कामांमध्ये कोणत्याही प्रकारची हयगय त्यांचेकडून होत नसे.

इ.स. १८०२ मध्ये झालेल्या बदामीच्या लढाईत शत्रूंशी लढताना सरदार जानराव पाटणकर धारातीर्थी पडले होते. त्यांना पुत्रसंतान नसल्यामुळे बाजी बिन द्वारकोजी पाटणकर यांचा कनिष्ठ बंधू दत्तक घेण्यासंदर्भात विचार करतात. यासंदर्भात सु।। सलास मयातैन अलफ, छ २७ जीलकाद (दिनांक २२ मार्च, १८०३) रोजी पत्र पाठवून पेशवे बाजीराव दुसरे रमाबाई व जीजाबाई कोम जानराव पाटणकर यांना म्हणतात की, '......जानराव बिन नागोजी सालोखे देशमुख सन सबा समानीमात बदामीचे स्वारीस सरकार कामावर पडिले. त्याचे पोटी पुत्र संतान नाही व दोघी स्त्रिया यांचे संरक्षण जाले पाहिजे व वतनास अधिकारी असावा. हे जाणोन पत्र सादर केले असे. तरी बाजी बिन दारकोजी पाटणकर हे आपला कनिष्ठ बंधू देत आहेत तो दतपुत्र घेणे......'.[११०] त्यांच्या या विचारास पेशवे बाजीराव दुसरे यांनी आपली संमती या पत्राद्वारे दिलेली दिसून येते. दुसरे बाजीराव पेशवे हे सरदार पाटणकर घराण्यांचे मराठा कालखंडातील योगदान जाणून आहेत. सरदार जानराव पाटणकर यांना आलेल्या वीरमरणानंतर त्यांच्या कुंटूंबियाची वाताहत होऊ नये, असे पेशव्यांना वाटल्याचे दिसून येते.

१८व्या शतकाच्या शेवटी इंग्रज—म्हैसुर तिसरे युध्द घडून आले. या युध्दात इंग्रजांच्या फौजेचे नेतृत्व जनरल आर्थर वेलस्ली याने केले होते. या फौजा मराठा साम्राज्यांच्या दक्षिणेस होत्या. इ.स. १८०० मध्ये नाना फडणवीसांच्या मृत्यूनंतर यशवंतराव होळकरांनी पुण्यावर हल्ला चढविला.

दौलतराव शिंदे आणि बाजीराव दुसरे यांच्या सैन्याचा हडपसर, पुणे येथे पराभव केला. तेव्हा बाजीराव दुसरे हे पुणे सोडून वसई येथे इंग्रजांच्या आश्रयी गेला. यातून दिनांक ३१ डिसेंबर, १८०२ मध्ये बाजीराव दुसरे यांनी इंग्रजांबरोबर वसईचा तह केला.[१११] या तहान्वये बाजीराव दुसरे यांस पेशवेपद परत मिळवून देण्याची जबाबदारी इंग्रजांनी स्वीकारली. तसेच इंग्रजांना त्यांचे सैन्य मराठा साम्राज्यात ठेवण्याची तसेच त्यांचे राजकीय कारभार पुण्यातून करण्याची परवानगी मिळाली. तेव्हा जनरल वेलस्ली याच्या फौजा मराठी मुलूखात दाखल झाल्या. त्यावेळी करवीर राज्याचे सरलष्कर नारायणराव पाटणकर हे होते. या इंग्रजी फौजेस करवीर मुलूखात चोर, लुटारू पासून रक्षण करण्यासंदर्भात सु।। सलास मयातेन अलफ, छ ११ जिलहेज (दिनांक २८ मार्च, १८०३) मध्ये जनरल वेलस्ली सरलष्कर नारायणराव पाटणकर यांना पत्र लिहिले होते. तसेच इंग्रजी फौजाकडून करवीर मुलूखातील गावांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, अशी शाश्वती दिल्याची दिसून येते.

या पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे, '.......श्रीमंत पंत प्रधानसो।ब यांनी आपले कुमकेस्तव कुंपनीच फौजेस बोलाविले वरून आम्ही लसकरसहित यां मुलकावर दाखल जाहल असो.....'.[११२] या कंपनी सैन्याच्या मार्गामध्ये चोर, लुटारूंचा त्रास होऊ नये, असा बंदोबस्त करणे. या संदर्भात पुढे असे लिहितात की, '......आपण आमचे लस्करासी येणार जाणार लोकांसी चोर वगैरे लोकांकडुन काही ईजा न होतेस आपणांस रास्ते चालतेस बंदोबस्त करून देऊन असणे....'.[११३] तसेच या कंपनीच्या सैन्यापासून आपल्या गावाला कोणातीही हानी होणार नाही, अशी खात्री देताना म्हणतात की, '.....आपले गावांसी काही उपसर्ग न होईल. आमचे लस्कर आमचे मुलकांसी जाताना आपली गांवची ठाणे आपणा कडिल सखोपंतचे जीमेसी देऊन जात असं.....'.[११४] म्हणजेच इंग्रजांनाही सरदार पाटणकरांच्या पराक्रमाची जाणीव होती. इंग्रजी सैन्याला सरदार पाटणकर यांच्याकडून कोणताही उपद्रव्य होऊ

नये, असे जनरल वेलस्लीला वाटत होते. यातच सरदार पाटणकरांचे मोठेपण पहावयास मिळते.

सरदार पाटणकर घराण्याच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची आणि उल्लेखनीय बाब म्हणजे इ.स. १८०८ मध्ये जानराव पाटणकर यांचे दत्तकपुत्र नागोजीराव पाटणकर यांचा विवाह कोल्हापूरचे श्रीमंत शिवाजी (दुसरे) महाराज छत्रपती यांच्या कन्या चिमाबाई आक्कासाहेब यांच्याशी झाला.[११५] दिनांक २१ जून, १८०८ मध्ये झालेल्या या विवाहाने पाटणकर घराणे आणि करवीर रियासतीच्या छत्रपती घराण्यांशी कित्येक वर्षाचा असलेला संबंध हा अधिक दृढ झालेला दिसून येतो. छत्रपती घराण्याच्या तोलामोलाचे, पराक्रमी वारसा आणि वसा घेतलेल्या सरदार पाटणकर घराण्यांशी आलेल्या संबंधामुळे सरदार पाटणकरांचे महत्त्व अधोरेखित होताना आपणांस पहावयास मिळते.

सरदार पाटणकर घराण्यांतील द्वारकोजीराव, लक्ष्मणराव, पिराजीराव, गोविंदराव, नारायणराव, बाजीराव आणि रामचंद्रराव यांनी मौजे बेलवाडी बु।। कसबा पाटण येथील आपल्या सरदेशमुखीच्या सेरी जमिनीपैकी ७ बिघे जमीन तपोनिधी महाराज गलगलेबाबा फकीर यांना इनाम दिनांक १५ जानेवारी, १८१० रोजी दिली. या संदर्भात एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रातील मजकुर पुढीलप्रमाणे, '......ईनाम पत्र लेहून दिल्हे एसीजे. आपण थोर सतपात्र आमचे दौलतीस व आम्हास कल्याण ईछीणार असे जाणुन आपले संवस्थान पौ।। मौजे बोलेवाडी बु।। क।। पाटण येथील देशमुखीची सेरि जमीन कालवट पौ।। बीघे ७ आक्षरी सात तुम्हास ईनाम करून दिल्हे असेत. तेणे प्रो।। आपण आमचे दौलतीस व आम्हास आसिर्वाद चिंतोन आपल्या वौंशपरंपरे+++++++अनुभऊन खावे.....'.[११६] पुढे या पत्रात असे नमूद करण्यात आले आहे की, '.....आम्हा कडुन अगर आमच्या वंशजाकडुन ईनाम जमीनीस अडथळा होणार नाही. जो करिल त्यास श्रीची शफत असे व कासीत गोहत्याचे पातक. असे हे ईनामपत्र लेहून दिल्हे.....'.[११७] म्हणजेच सरदार पाटणकरांच्या ठायी असणारी धार्मिक वृत्ती येथे पहावयास मिळते. भविष्यात सरदार पाटणकर

घराण्यांकडून या इनाम जमिनीत कोणत्याही प्रकारचा उपद्रव, हानी पोहचणार नाही, असे आश्वासन ते इनामपत्रात देताना दिसून येतात. थोडक्यात, सरदार पाटणकर हे धार्मिक कार्यातही अग्रेसर होते, हे आपणांस दिसून येते.

सरदार पाटणकर घराण्यांतील बाबासाहेब पाटणकर यांना दौलतराव घोरपडे अमीरूल उमराव यांचे इ.स. १८१२–१८३७ च्या दरम्यानचे पत्र उपलब्ध आहे. या पत्रातून असे कळते की, गर्व्हनर साहेबांची स्वारी खंडाळयात येईल. त्यावेळी त्यांची भेट घेऊन सविस्तर अर्ज करण्यात येईल. परंतु हा अर्ज कशासंदर्भात आहे, हे आपणास कळत नाही. या पत्रातील मजकुर पुढीलप्रमाणे, '.....सर्व आपले घरचा मा।र ध्यानी असतच आहे आलीशां गौरनर साहेबाचे स्वारी खंडाले मु।। आली म्हणजे भेट घेऊन सविस्तर अर्ज करण्यात येइल. कलावे, वरचेवर पत्रद्वारे समाचार घेत असावा......'.[११८] या पत्रातून असे दिसून येते की, इंग्रजांशीही सरदार पाटणकरांचे दृढसंबंध होते.

इ.स. १८२१ मध्ये सातारच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी इनामदार, जहागीरदार व इतर श्रीमान् लोकांची यादी केली, त्या वेळीं त्या यादींत सरदार पाटणकर घराण्यातील नागोजीराव पाटणकर यांच्या नावे ४३ गावे इनाम जहागीर असल्याबद्दल त्यांचा उल्लेख आढळतो.[११९]

सरदार पाटणकर घराण्यातील रामचंद्रराव ऊर्फ आप्पासाहेब पाटणकर हे ग्वाल्हेर संस्थानात सेवा बजावत होते. ग्वाल्हेर संस्थानतर्फे रजपुतांविरूध्द झालेल्या लढयात राजश्री आप्पासाहेब पाटणकर विजयी झाले. त्यांच्या पराक्रमावर खुश होऊन सौ.बायजाबाईसाहेब शिंदे यांनी त्यांच्याशी नाते जोडले. त्यांना जावई म्हणून पसंद केले. इ.स. १८१६ मध्ये राजश्री आप्पासाहेब पाटणकर यांचा विवाह सौ.बायजाबाईसाहेबांच्या कन्येशी झाला.[१२०] या विवाहप्रसंगी आप्पासाहेबांना दरसाल सव्वा लाख रूपयांची जहागिरी मिळाली. त्यांना लग्नात ग्वाल्हेर संस्थानकडून १० मन सोने, हत्ती व अन्य चीजवस्तू भेट दाखिल मिळाल्या.[१२१] राजश्री आप्पासाहेब पाटणकर यांना पालखी, छत्री, चौरी व हत्तीचा मान होता.[१२२] हे सरदार पाटणकर घराण्यांच्या

दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेले दिसून येते. म्हणजेच, भारतातील प्रमुख पराक्रमी घराणे सरदार पाटणकर यांच्याशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करू इच्छित होते. यामागचे कारण म्हणजे सरदार पाटणकर यांचा गौरवशाली, दैदिप्यमान इतिहास होय.

कंपनी सरकारच्या कैदेतून त्रिंबकजी डेंगळे निसटून गेल्यावर त्यांना पकडण्यासाठी इंग्रजांनी जंगजंग प्रयत्न सुरू केले. खुद्द पेशवे बाजीराव दुसरे यांच्यावर दडपण आणून त्यांच्याकडून त्रिबंकजीस पकडण्याचा जाहीरनामा प्रसिध्द केला. या जाहीरनाम्याची पेशव्यांनी नागोजीराव पाटणकरांना दिनांक ४ जून, १८१६ मध्ये पाठविलेली प्रत पुढीलप्रमाणे, '.....त्रिंबकजी डेगला कुंपनी ईंग्रज बहादूर याचे कैदेतून पळून बंड करीत फिरतो. त्याची चौकसी तुम्हाकडे ता। पाटण माहाल आहे तेथे गावगना करून डेंगला म।र याचे ठिकाण लाऊन जिंवत अगर मेला सरकारात हवाला करून त्याजला दोन लक्ष रूपये बक्षीस व हजार रूपयांचा गांव ईनाम ईंग्रज बाहादूर याचे विद्यमाने दिल्हा जाईल.....'.[१२३] म्हणजेच त्रिंबकजी डेंगळे यांच्यावर कंपनी सरकार किती लक्ष देऊन होती. तसेच त्याच्यासाठी दोन लाख रूपये बक्षीस व हजार रूपयांचा महसूल असणारे गांव इनाम म्हणून इंग्रज देणार होते. तसेच '..... समस्त गरीब रयत ब्राम्हण व मराठे व परदेसी व मुसलमान व वाणी ऊदमी व बेरड भील व मांग रामोसी व रहदार वगैरे जे कोणी त्रिंबकजी डेंगला याचा पता अमुक जाग्यावर आहे असा प्रत्यक्ष सरकारात दाखवून देतील त्यास पाच हजार रू।। बक्षीस व येक चाहूर जमीन ईनाम ईंग्रज बाहादूर याचे विद्यमाने पावेल डेंगला म।र याचा पता ठाऊक असोन जर कोणी सरकारात समजाविण्यात आलस केला असे विदीत जाहाले तरी त्याचे पारिपत्य होईल........'.[१२४] म्हणजेच इंग्रजांनी त्रिंबकजी डेंगळे यांच्या विरोधात कुणी मदत किंवा कुणी जाणूनबुजून त्याला पाठीशी घालत असेल तर त्यांना कडक शब्दात समज दिलेला दिसून येतो.

दिनांक ९ जून, १८१७ रोजीचे एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रामध्ये ग्वाल्हेरचे दौलतराव शिंदे यांच्या कन्येच्या विवाहाचा वृत्तांत आहे. या शाही विवाहास इंग्रजांचा वकील कर्नल क्लोज, आबोजी घाटगे, सरदार पाटणकर घराण्यांतील सरदार मानसिंगराव पाटणकर इत्यादी बडी मंडळी हजर असल्याची नोंद या पत्रात सापडते. या पत्रातील मजकुर पुढीलप्रमाणे, '......साहा घटका रात्रीस ईंग्रजा कडील वकील कलोष साहेब व दूसरे तीन गोरे आसे च्यार आसामी आले ते येऊन बसल्यावर ही राव घाटगे आले आबोजी घाटगे मोठे मोठे मानकरी सर्व येऊन बसले ऊपरांत प्रहर रात्रीचे सूमारे आपण येऊन कचेरीस बसले मागाहून मानसींगराव पाटणकर आले.....'.[१२५] या विवाहामध्ये सरदार मानसिंगराव पाटणकर यांना खडी ताजीम देऊन त्यांचा मोठा सन्मान केल्याची माहिती या पत्रात आपणास मिळते. '......त्यास खडी ताजीम देऊन कलोष साहेबास बापु चिटणिसां कडुन सांगवीले व्याहीयांस भेटावे त्यावरून च्यार आसामी मानसींगराव जेथे ऊभे होते तेथे येऊन भेटून मागती जाग्यावर जाऊन बसले ऊपरांत अतर विडे देऊन ईंग्रजास निरोप दिल्हा ते गेले नंतर भोजनाचा समारंभ व्याही सूधा मध्य रात्रीस होऊन निद्रा करावयास गेले मानसींगराव ही वाड्यात रात्री राहीले......'.[१२६] म्हणजेच समकालीन मराठा सरदारांमध्ये सरदार पाटणकर घराण्यांचा असलेला लौकिक आपणांस पाहावयास मिळतो. तसेच या घराण्यांविषयी इंग्रंज तसेच इतर सरदारांना वाटणारी आत्मियता आपणांस पहावयास मिळते.

दिनांक १६ जून, १८१७ मध्ये सरदार पाटणकरांच्या सेवेत असलेल्या बाळोजी सावंत या सेवकाने नागपूर मुक्कामाहून आपल्या धन्यास म्हणजे सरदार पाटणकरांना लिहिलेले एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रानुसार नागपूरकर मुधोजी भोसले यांच्या दरबारातील बारीक सारीक हालचालींची नोंद या पत्रामध्ये घेतलेली दिसून येते. या पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे, '.......राजेश्री मुधोजी भोसले प्राताहाचे निद्रा करून उठल्यावर रामचंद्र वाघ व सीदी अलीखान व अम्रतराव पांडुरंग व नारायेण कासीमालीकर

नारो सखाराम व नागो त्र्यंबक व गणपतराव सुभेदार वगैरे मंडली येऊन दोन प्रहर परीयेत दरबार होऊन आपलाले घरास गेले......'.[१२७] नागपूरकर मुधोजी भोसले यांच्या दरबारातील मंडळींचा उल्लेख येथे आपणांस पहावयास मिळतो.

पुढे या पत्रात असे म्हणतात की, '.....मुधोजी भोसले याणी स्नान देव पुज्या करून भोजन होऊन निद्रा करून उठले तो नविन सासरे मोहीते यांचे येथे मेजमानी म्हणुन तेथे जाऊन भोजने होऊन पोशाक सेला पागोटे व कंठी मोत्याची व सीरपेच येणे प्रमाणे देऊन अतर पानदान घेऊन स्वारी दोन घटका दिवस राहाताच हवेलीस आली.....'.[१२८] या मजकुरावरून आपणांस हे लक्षात येते की, नागपूरकर मुधोजी भोसले यांचे दैनंदिन व्यवहार तसेच नुकतेच त्यांचे वैवाहिक संबंध मोहीते घराण्यांशी आलेले दिसून येतो. तसेच मोहित्यांकडून मुधोजी भोसले यांना जो मानसन्मान दिला गेला. त्याबद्दलचा उल्लेख इथे आपणांस पहावयास मिळतो.

तसेच सरदार पाटणकर घराण्यातील नायकोजीराव पाटणकर हे दौलतराव शिंदे यांच्या सैन्यात सामील होते. परंतु काही कारणास्तव ते रूसून नागपूरकर मुधोजी भोसले यांचेकडे आले असल्याचे वृत्त होते. यातील मजकूर पुढीलप्रमाणे, '.....आणी सींदे याचे लस्कारातून नायेकोजीराव पाटणकर रूसुवा करून येथे आज दोन च्यार महीने जाले आले आहेत त्यास मार।नीलेची नेमणूक होऊन शंभर स्वाराची हाजरी घेतली....'.[१२९] यावरून असे दिसते की, सरदार नायकोजीराव पाटणकर यांना १०० स्वारांची नेमणूक झाल्याची बातमी आपणांस इथे पहावयास मिळते. या पत्रावरून असे दिसून येते की, अनेक मातब्बर सरदार आपली खास माणसे गुप्तरीत्या दुसऱ्या सरदारांच्या गोटात पाठवत होती. जरी हा राजनीतीचा भाग असला तरी ही वरील माहितीवरून आपणांस तत्कालिन सामाजिक, राजकीय जीवन पहावयास मिळते.

उत्तर पेशवाईच्या कालखंडातील हा महत्त्वाचा कागद आहे. जून, १८१७ मधील या कागदपत्रामध्ये बाबाजी पाटणकर, नारायणराव पाटणकर आणि येकोजी पाटणकर अशा तीन सरदार पाटणकर

घराण्यातील व्यक्तींचा उल्लेख मोठया प्रमाणात येतो. बाबाजी पाटणकरांनी दमाजी इंगळे यांच्या व्यवस्थेविषयी विनंती केल्याचा उल्लेख एका कलमामध्ये आढळतो. तो असा की, 'दमाजी इंगले याज विसी बाबाजी पाटणकर याणि विनंती केली येउन तीन मास जाले आद्याप बंदोबस्त त्याचा होत नाही निरोप दिल्यास होलकराकडे जाऊन राहातील तेंव्हा लग्न जाल्यावर बंदोबस्त करून देतो म्हणोन सांगीतले.'[१३०] यातील मजकुरानुसार कुणाचा बंदोबस्त याविषयी नक्की समजत नाही. तसेच लग्न झाल्यावर बंदोबस्त करून देतो, याचा अर्थ इंगळे यांच्या घरी लग्नकार्य आहे, असा होतो.

या कागदपत्रातील पुढील मजकुर, 'नारायेणराव पाटणकर व त्यांचे बंधु व कदम भोसले देसी हून आले त्याना वस्त्रे साडेतीन सनगे व सीरपेच कंठया व .....'.[१३१] सरदार नारायणराव पाटणकर कोल्हापूर दरबारातील सरलष्कर होते. त्यांना मानाची वस्त्रे, शिरपेच, कंठा देऊन त्यांचा सन्मान केल्याचा उल्लेख या कलमात झालेला दिसून येतो. या कागदपत्रातील शेवटच्या कलमात सरदार पाटणकर घराण्यातील येकोजी पाटणकर दौलतराव शिंद्यांच्याकडून रूसून आल्याचे व त्यांना शंभर स्वारानिशी सेवेत ठेवल्याची नोंद आहे. हा मजकुर पुढीलप्रमाणे, '......येकोजीराव पाटणकर सींद्या कडुन रूसून आले त्यास शंभर स्वारानिशी ठेवीले....'.[१३२]

इ.स. १८१८ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या कारकिर्दीत पेशवाईचा अस्त झाला. पेशव्यांचा अंमल संपून इंग्रजांचा अंमल महाराष्ट्रात त्याचबरोबर संपूर्ण भारतात सुरू झाला.

**सारांशः**

पेशवेकालीन कागदपत्रातून हे स्पष्ट होते की, सरदार पाटणकर घराण्यांतील अनेक व्यक्तींनी मराठा राज्याची सेवा केलेली होती. पेशवाईचा अस्तापर्यंत मराठी राज्याची इमानेइतबारे लष्करी व राजकीय सेवा केलेली दिसून येते. पाटणकर घराण्याच्या पेशवेकालीन कागदपत्रात रामराव,

द्वारकोजीराव, नागोजीराव, राजसबाई, हिरोजीराव, सटवोजीराव, नाथाजीराव, जानराव, आपाजीराव, रमाबाई, जिजाबाई, नारायणराव, मानसिंगराव, येकोजीराव इत्यादी पाटणकर घराण्यातील व्यक्तींची पत्रे आहेत. त्यातून तत्कालीन राजकीय घडामोडींवर तसेच पाटणकर घराण्याच्या इतिहासावर प्रकाश पडतो.

शाहू महाराज मोगलांच्या कैदेतून सुटून स्वराज्यात आले त्यावेळी चांदजीराव पाटणकर हयात नव्हते, असे दिसते. कारण त्यांची मुले रामराव व सुभानराव शाहू महाराजांना भेटल्याचा व त्यांनी चांदजीरावांच्या काळी चालत असलेली इनामे व वतने चालू ठेवल्याचा महत्त्वाचा उल्लेख दिनांक १ एप्रिल, १७०८च्या पत्रात येतो. शाहू महाराजांची बाजू न्याय हक्काची आहे, याची जाणीव होताच कोणताही अन्वेश न ठेवता, ते शाहू महाराजांच्या बाजूने भक्कमपणे उभे राहिलेले दिसून येतात.

पहिले बाजीराव पेशवे यांच्या काळात पाटणकर घराण्यातील द्वारकोजीराव व त्यांचे चिरंजीव सेवेत असल्याचा व चिमाजी आप्पांच्या सिद्दी सातवरील स्वारीत द्वारकोजीरावांचा चिरंजीव त्यांच्या फौजेत असल्याचा उल्लेख आपणांस कागदपत्रातून मिळतो.

सरदार पाटणकर घराण्याचे कोल्हापूरकर छत्रपतींशीही जवळचे संबंध दाखविणारी काही कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यामध्ये सरदार नागोजीराव पाटणकर, राजसबाई पाटणकर यांना लिहिलेली अनुक्रमे कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज व जिजाबाईसाहेब यांची पत्रे आहेत. त्यांचा विषय प्रामुख्याने सोयरिकीसंबंधी व वतनासंबंधी असलेला दिसून येतो.

नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत पाटणकर घराण्यांतील सटवोजी पाटणकर, पिराजी पाटणकर, भागुजी पाटणकर पेशव्यांच्या आरमारात सेवा करीत असल्याचा उल्लेख दिसून येतो. पेशवेकाळात कर्नाटकातील मोहिमांचे संयोजन पेशव्यांनी पटवर्धन, मेहेंदळे, रास्ते आदी सरदारांकडे सोपविले होते. पाटणकर घराण्यातील सरदार नाथाजीराव पाटणकर हे

या मोहिमांत मल्हारराव मेहेंदळे यांच्या फौजेत लष्करी सेवा बजावित होते. त्यासंबंधीचा उल्लेख इ.स. १७५८च्या कागदपत्रामध्ये येतो.

पेशवाईत पाटणकर घराण्यातील सर्वात पराक्रमी पुरूष म्हणून सरदार जानराव पाटणकरांचा उल्लेख करावा लागतो. जानराव पाटणकर यांनी उदगीरच्या लढाईत पराक्रम दाखविल्याचा उल्लेख आपणांस मिळतो. दिनांक ३० जानेवारी, १७६०च्या कागदपत्रात सरदार पाटणकरांचा उल्लेख येतो. तो नक्कीच सरदार जानराव पाटणकरांच्याविषयीचा आहे. यानंतर सरदार जानराव पाटणकर यांनी पानिपत आणि राक्षसभुवन या लढायांतही पराक्रम गाजविल्याचे दिसून येते.

नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर माधवराव पेशवे यांच्या काळातही सरदार पाटणकर घराण्यातील सरदार जानराव पाटणकर हे मराठा राज्याच्या सेवेत होते. त्यांनी निजामाविरूध्दच्या मोहिमेत सहभाग घेतलेला दिसून येतो. पुढे पेशवे नारायणरावांच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या बारभाईंच्या कारस्थानात सरदार जानराव पाटणकरांनी सवाई माधवराव पेशवे यांचा पक्ष स्वीकारून रघुनाथराव पेशव्यांच्या विरोधातील लढयात मोठे शौर्य गाजविले. या संदर्भात पेशव्यांच्या नावे त्यांच्या कारभाऱ्यांनी सरदार जानराव पाटणकर यांना पाठविलेल्या पत्रात मोठा गौरव केलेला आढळतो.

कर्नाटकात टिपू सुलतानाविरूध्दच्या मराठयांच्या मोहिमांत सरदार जानराव पाटणकर आपल्या सैन्यासह सहभागी झाले होते. खडर्याच्या लढाईत त्यांनी सहभाग घेतला होता. पुढे बदामीचा किल्ला घेत असताना इ.स.१८०२ मध्ये सरदार जानराव पाटणकर हे धारातीर्थी पडलेले, हे तत्कालिन कागदपत्रांवरून दिसून येते.

उत्तर पेशवाई कालखंडात सरदार नारायणराव पाटणकरांचा उल्लेख अनेक कागदपत्रांमध्ये येतो. सरदार नारायणराव पाटणकर हे आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर कोल्हापूर रियासतीचे सरलष्कर पदावर कार्यरत असलेले दिसून येतात. दुसरे बाजीराव पेशवे यांचा कारभारी त्रिंबकजी डेंगळे हा

जेव्हा इंग्रजांच्या कैदेतून निसटला, तेव्हा त्याला पकडून देण्याची जबाबदारी इंग्रजांनी दुसरे बाजीराव पेशवे यांचेवर सोपविली. दुसरे बाजीराव पेशवे यांनी नाईलाजाने त्रिंबकजींच्या विरोधात त्यास कैद करण्याचा फतवा काढावा लागला, हा इतिहास सर्वज्ञातच आहे. त्या संदर्भात पेशव्यांनी सरदार नागोजीराव पाटणकर यांना पाठविलेल्या पत्रांतून तत्कालिन परिस्थितीचा आपण अंदाज करू शकतो. तसेच दुसरे बाजीराव पेशवे हे इंग्रजांच्या हातचे बाहुले बनल्याचे दिसून येते.

थोडक्यात, सरदार पाटणकर घराण्यातील सरदार नागोजीराव पाटणकर यांनी पेशवे बाळाजी विश्वनाथ व बाजीराव पहिले यांच्याबरोबर अनेक मोहिमा गाजवल्या. तर सरदार जानराव पाटणकर यांनी नंतरच्या येणाऱ्या सर्व पेशव्यांसमवेत म्हणजे पेशवे नानासाहेब, सदाशिवरावभाऊ, थोरले माधवराव, रघुनाथराव पेशवे, सवाई माधवराव, बाजीराव दुसरे यांच्यासमवेत महत्त्वपूर्ण लढयात भाग घेतला. पेशवाईत पुण्यात मुठेकाठी फौजबंद पाटणकर सरदारांचे लष्कर उतरण्याची खास जागा होती.

**-: टीपा व संदर्भ :-**


१) रू.क्र.१, पु.क्र.१, पत्र क्र. १३६२०, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

२) कित्ता.

३) कित्ता.

४) प्रा.डी.डी.चव्हाण, *'क्षत्रिय कुलावतंस चालुक्य–सोळंखी–साळुंखे ऊर्फ श्रीमंत सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास'*, श्रीराम प्रकाशन, पाटण, सुधारित द्वितीय आवृत्ती, ८ एप्रिल, २०१४, पान नं. १२२.

५) कित्ता.

६) कित्ता.

७) कित्ता.

८) कित्ता.

९) कित्ता, पान नं. १२३.

१०) कित्ता.

११) कित्ता.

१२) कित्ता.

१३) कित्ता.

१४) कित्ता.

१५) कित्ता, पान नं. १२४.

१६) कित्ता, पान नं. १२५.

१७) कित्ता.

१८) कित्ता.

१९) कित्ता.

२०) कित्ता, पान नं. १२६.

२१) कित्ता.

२२) पत्र क्र. २१७८, सातारा जमाव, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

२३) कित्ता.

२४) कित्ता.

२५) कित्ता.

२६) कित्ता.

२७) लेखांक १८४, सरदेसाई खंड ३, जंजिऱ्याच्या सिध्दीवर छ.शाहूंची मोहिम, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

२८) कित्ता.

२९) कित्ता.

३०) कित्ता.

३१) कित्ता.

३२) रू.क्र.१, पु.क्र.१, पत्र क्र. १९, स.पा.द., मुं.पु.वि.मुं.

३३) रू.क्र.१, पु.क्र.१, फे.नं.१७४१, पान नं.६९, स.पा.द., मुं.पु.वि.मुं.

३४) रू.क्र.१, पु.क्र.३, स.पा.द., मुं.पु.वि.मुं.

३५) कित्ता.

३६) कित्ता.

३७) रू.क्र. ११५२, सातारा जमाव, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

३८) स.शं.देसाई, *'पोर्तुगीज मराठा संबंध'*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८९, पान नं. १४८.

३९) पत्र क्र. १८८६, रू.क्र.२, पु.क्र. ४, सं.नि.का. वर्णनात्मक सूची खंड १, विभाग १, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

४०) कित्ता.

४१) सुनिल द. दापुरकर, *'श्रीमंत सरदार पाटणकर हुजुरवाडेकर (चाालुक्य ऊर्फ साळुंखे) क्षत्रिय कुळाचा इतिहास व ऐतिहासिक कागदपत्रे'*, गगनगिरी प्रकाशन, गगनगिरी, प्रथमावृत्ती, २००३, पान नं. ६०.

४२) कित्ता.

४३) कित्ता.

४४) कित्ता.

४५) कित्ता.

४६) कित्ता, पान नं. ५३.

४७) कित्ता.

४८) कित्ता.

४९) कित्ता.

५०) कित्ता.

५१) कित्ता, पान नं. ६०.

५२) कित्ता.

५३) कित्ता.

५४) कित्ता.

५५) कित्ता.

५६) कित्ता.

५७) कित्ता.

५८) पत्र क्र. ३६६९, रू.क्र.७, पु.क्र. २, सं.नि.का. वर्णनात्मक सूची खंड १, विभाग १, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

५९) कित्ता.

६०) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. २७२.

६१) कित्ता.

६२) कित्ता.

६३) लेखांक ५९, पान ४४, सरदेसाई खंड ३, उदगीरची लढाई (द बॅटल ऑफ उदगीर), पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

६४) कित्ता.

६५) कित्ता.

६६) कित्ता.

६७) कित्ता.

६८) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ५३.

६९) अतुल अर्जुन ओहाळ, *‘सरदार दमाजी गायकवाड यांचे जीवनचरित्र व कार्य: एक ऐतिहासिक अभ्यास’*, अप्रकाशित प्रबंध, एप्रिल, २०१६, पान नं. १५४.

७०) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ५५.

७१) पत्र क्र. २३६१ कारभारविषयक, रू.क्र.५, पु.क्र.१, सं.नि.का. वर्णनात्मक सूची खंड १, विभाग १, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

७२) रू.क्र.४, पान ५८—८६ नं. २०९९ ते २१०१, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

७३) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ५५.

७४) कित्ता.

७५) कित्ता.

७६) इनाम कमिशन रू.क्र. ३५० (अ), शराकती दुमालदार रेकॉर्ड, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

७७) रू.क्र.१, पु.क्र.३, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

७८) कित्ता.

७९) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १३२.

८०) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ५९.

८१) कित्ता.

८२) कित्ता, पान नं. ५५.

८३) कित्ता.

८४) रू.क्र.१, पु.क्र.४, पान.नं. ३६० व ३६१, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

८५) फेरिस्त नं.६, रू.क्र.२, पु.क्र.१, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

८६) कित्ता.

८७) कित्ता.

८८) रू.क्र.१, पु.क्र.४, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

८९) कित्ता.

९०) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ, पान नं. १३२.

९१) पूर्वोक्त, स.शं.देसाई, 'पो.म.सं.', पान नं. १४८.

९२) कित्ता.

९३) कित्ता.

९४) कित्ता.

९५) कित्ता, पान नं. ६२.

९६) कित्ता.

९७) कित्ता.

९८) पत्र क्र. १२७२० अ, रू.क्र.८१, पु.क्र.२, सं.नि.का. वर्णनात्मक सूची खंड १, विभाग १, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

९९) कित्ता.

१००) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का, पान नं. ५६.

१०१) कित्ता.

१०२) कित्ता.

१०३) पत्र क्र. ७३२०अ, रू.क्र.४७, पु.क्र.३, कोल्हापूर अभिलेखागार वर्णनात्मक सूची खंड १, कोल्हापूर पुराभिलेखागार, कोल्हापूर.

१०४) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का, पान नं. ११२.

१०५) कित्ता.

१०६) कित्ता.

१०७) पत्र क्र. ९८४८, रू.क्र.१८, पु.क्र.४, सं.नि.का. वर्णनात्मक सूची खंड १, विभाग १, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

१०८) कित्ता.

१०९) कित्ता.

११०) रू.क्र.१, पु.क्र.४, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

१११) www.google.com/wiki.

११२) पत्र क्र. १५८०४अ, रू.क्र.१०४, पु.क्र.२, कोल्हापूर अभिलेखागार वर्णनात्मक सूची खंड १, कोल्हापूर पुराभिलेखागार, कोल्हापूर.

११३) कित्ता.

११४) कित्ता.

११५) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १३६.

११६) पत्र क्र.११५१, सातारा जमाव, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

११७) कित्ता.

११८) पत्र क्र. १६०६३अ, रू.क्र.१०५, पु.क्र.३, कोल्हापूर अभिलेखागार वर्णनात्मक सूची खंड १, कोल्हापूर पुराभिलेखागार, कोल्हापूर.

११९) फेरिस्त रूमाल नं. ३६७, सातारा दप्तर, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

१२०) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ७१.

१२१) कित्ता, पान नं. ७१.

१२२) कित्ता, पान नं. ७१.

१२३) रू.क्र.१, पु.क्र.४, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

१२४) कित्ता.

१२५) पत्र क्र. १७४१६, रू.क्र.३१, पु.क्र.२, सं.नि.का. वर्णनात्मक सूची खंड १, विभाग १, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

१२६) कित्ता.

१२७) पत्र क्र. १७८५१ कारभारविषयक, रू.क्र.३२, पु.क्र.२, सं.नि.का. वर्णनात्मक सूची खंड १, विभाग २, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

१२८) कित्ता.

१२९) कित्ता.

१३०) पत्र क्र. १८५२६, रू.क्र.३३, पु.क्र.४, सं.नि.का. वर्णनात्मक सूची खंड १, विभाग १, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

१३१) कित्ता.

१३२) कित्ता.